दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -२८ | शनिवार, दि.०४ ऑक्टोबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-28 | Saturday, Dt.04 October 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# ओपन ओबीसी वाद लावून सरकारचा नवा राजकीय डाव..!

## येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेत एससी आणि एसटी आरक्षणावर होणार अन्याय ?

**बीड / वैभव स्वामी**

येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सरकार मोठा राजकीय डावपेच खेळत आहे. महाविकास आघाडी सरकार असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाणीवपूर्वक होऊ दिल्या नाहीत. आता सत्तेत असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत देखील आपलीच सत्ता आणण्यासाठी सरकार ओपन आणि ओबीसी यांचा राजकीय वाद पेटवून येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेत एससी आणि एसटी आरक्षणावर मोठा अन्याय करत आपली राजकीय पोळी भाजून घेण्याच्या तयारीत आहे. यावर आपल्या आरक्षणाला धक्का लागणार नाही म्हणून निद्रावस्थेत असलेला एससी आणि एसटी प्रवर्ग जागा होणार आहे का ? हा खरा प्रश्न निर्माण झाला आहे.

घटनेचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेमध्ये कलम १४ अंतर्गत एससी आणि एसटी प्रवर्गावर कधीही अन्याय होणार नाही अशा प्रकारची घटनेतच राजकीय सह सर्व आरक्षणाची सुरक्षितता अबाधित केलेली आहे. या घटनेला हात लावण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने केला. यावर रान पेटल्यामुळे केंद्रामध्ये एक हाती सत्ता भाजपाला घेता आली नाही. घटना दुरुस्ती त्यांना करता आली नाही ही वस्तुस्थिती आहे. दुसरीकडे आता केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशामध्ये सरकार विविध जाती प्रवर्गामध्ये आरक्षणावरून वाद पेटवत आपला राजकीय स्वार्थ साधून घेण्याच्या तयारीत उतरलेला आहे. हे मोठे छुपे राजकीय षडयंत्र आहे.महाराष्ट्रामध्ये ओपन आणि ओबीसी हा वाद पेटवण्यात बऱ्यापैकी यश मिळाले आहे. आता या वादामध्ये सत्तेत फायदा मिळवण्यासाठी सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्याचा निर्णय निश्चित केला आहे. सद्यस्थितीमध्ये सरकारने घेतलेल्या भूमिका प्रामुख्याने लाडकी बहीण ही योजना येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेत देखील खणकते नाणे ठरणार आहे. त्याचबरोबर मराठवाड्यासह महाराष्ट्रात अपत्यकालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत जलप्रलयामुळे ओला दुष्काळ जाहीर करून सरकार निवडणुकीच्या







तोंडावर शेतकऱ्यांसह पुराने बाधित झालेल्या प्रत्येक घटकांना मदत देऊन या मतदारांना आपलंसं करून घेण्यात लवकरच यश मिळवेल. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत सरकारला सत्तेत येण्याचा हेतू साध्य होण्यापर्यंत पोषक वातावरण तयार करायचे आणि दुसरीकडे ओपन आणि ओबीसी असा राजकीय वाद पेटता ठेवायचा. मात्र या राजकीय वादामध्ये सरकार खऱ्या अर्थाने एससी आणि एसटी प्रवर्गातील आरक्षणावर मोठा अन्याय छुप्या पद्धतीने करत आहे हे मात्र उघड समोर येत नाही हे खरे दुर्दैव म्हणावे लागेल.२५ वर्षानंतर लोकसभा विधानसभा निवडणुकातील आरक्षण बदलत राहते हा घटनेचा नियम आहे. तर स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये दर पाच वर्षाला राजकीय आरक्षण बदलत राहते.

या आरक्षणामध्ये प्रामुख्याने ज्या प्रभागात, सर्कलमध्ये सर्वाधिक समाज आहे तो प्रभाग ते सर्कल हे त्या त्या समाजासाठी आरक्षित केले जाते. पुढच्या पाच वर्षांमध्ये हे आरक्षण बदलते. यापेक्षा पहिल्यापेक्षा जिथे कमी जिथे समाज आहे त्या ठिकाणी आरक्षण दिले जाते. अशा पद्धतीने उतरत्या क्रमाने शेवटच्या टप्प्यात ज्या ठिकाणी आरक्षण असलेला समूह जात अत्यल्प आहे आणि त्या ठिकाणी इतर समाज बहुल आहे अशा ठिकाणी आरक्षण सर्वात शेवटी येते. आता ही निवडणूक याच टप्प्यामध्ये आलेली होती. मात्र सरकारने या शेवटच्या टप्प्यांमध्ये जिथे एससी, एसटी प्रवर्ग अत्यल्प आहे आणि इतर समाज जास्त आहे अशा प्रवर्गामध्ये जर नियमानुसार आरक्षण लावले असते तर या प्रवर्गातून जिथे समाज कमी असताना सुद्धा आरक्षणाचा फायदा एससी एसटी प्रवर्गातील घटकांना मिळाला असता. त्या प्रवर्गातून त्यांना निवडून येता आले असते. आणि ज्या ठिकाणी समाज बहुसंख्येने आहे. त्या प्रवर्गात सुद्धा एससी एसटी प्रवर्गातील उमेदवार बहुसंख्येच्या जोरावर निवडून आले असते. म्हणजेच उदाहरणार्थ बीड जिल्हा परिषद अंतर्गत जर ८ जागा एसी, एसटी प्रवर्गासाठी सुटणार असतील तर त्या आरक्षित जागेवरून तर आठ ठिकाणी उमेदवार निवडून आलेच असते शिवाय ज्या प्रवर्गात मागील अनेक वर्षापासून आरक्षणामुळे आणि जातीच्या समीकरणांमध्ये एससी, एसटीचा प्रवर्ग लोकसंख्येने जास्त आहे. त्या ठिकाणी सुद्धा या प्रवर्गातील उमेदवार निवडून आले असते.म्हणजेच ही संख्या आठ अशी मर्यादित न राहता ही संख्या १३ - १४ या घरामध्ये गेली असती. म्हणजे आरक्षणापेक्षा सुद्धा जास्त संख्या एससी, एसटी प्रवर्गातील निवडून येणारी ठरली असती मात्र असे न होवू देता सरकारने शेवटच्या टप्प्यात ज्या प्रवर्गामध्ये कधीच एससी,एसटी प्रवर्गाचे आरक्षण पडले नाही त्या प्रवर्गामध्ये आता एससी एसटीचे आरक्षण पडले असते ते न पडू देता पुन्हा पहिले पाढे पंचावन्न करत पहिल्यापासून आरक्षणाचा धडा गिरवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी पारंपारिक आरक्षण होते त्याच ठिकाणी पुन्हा जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, नगरपंचायत, महानगरपालिका यामध्ये आरक्षण पडेल ज्याचा सर्वात मोठा फटका एससी आणि एसटी प्रवर्गाला भविष्यात होणार आहे. आपल्या हक्काच्या जागा गमवण्याची मोठी वेळ या प्रवर्गावर येणार आहे. तेव्हा सरकारला वठणीवर आणण्यासाठी, समाजाच्या हितासाठी जर कोणी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले, न्यायालयाला ही बाब कायदेशीर दृष्टिकोनातून

(उर्वरीत पान २ वर)

# बीड कारागृहामध्ये आरोपीला बेदम मारहाण

## आता कारागृहातही फोफावतोय जातीवाद ?

### गृहमंत्री फडणवीस आणि जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांच्या भुमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष लागून !

बीड / विशेष प्रतिनिधी

बीड येथील कारागृहामध्ये मोगरा ता.माजलगाव येथील बंडु जाधव नावाच्या आरोपीस एका गुन्ह्यामध्ये अटक असून या आरोपीला पोलीस कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून विनाकारण बेदम मारहाण करण्यात आली असून ही मारहाण तुरुंगातील सहा (६) नंबर बॅरेटच्या सीसीटीव्ही मध्ये तर सात (७) नंबरच्या बराक समोरील सर्कल कॅमे-यात कैद झाली आहे.

तुरुंगाधिकारी जेलर गायकवाड, तर सह-जेलर रुकमे हे असुन मारहाण करणारे गवते, घोडके कर्मचारी-अधिकारी उघडपणे बराक नंबर सहा व सात (६-७) च्या समोरील सर्कल गेट मधील कॅमे-यात दिसून येत आहेत. ही मारहाण करण्यामध्ये नेमके काय कारण आहे अद्याप समजू शकले नाही. परंतु बीड कारागृहात आता जेलरच्या संमतीने काही पोलीस कर्मचारी-अधिकारी मोठ्या प्रमाणात जातिवाद करत आपली मनमानी करत आहेत. अनेक कर्मचारी तुरुंगात सध्या आपला जीव मुठीत धरून राहत असल्याचे काही आरोपींनी नाव न छापण्याच्या सांगण्याच्या अटीवर आमच्या प्रतिनिधी पर्यंत तुरुंगातील हा अत्यंत भयावह असा प्रसंग पोहोचवला असल्याने आणि इतरही सूत्रांकडून मिळालेल्या अजूनही काही गुप्त माहितीनुसार आजमीतिला बीड जेल मधील वातावरण अतिशय भयावह झाले असून अनेक आरोपी अत्यंत भीतीदायक वातावरणामध्ये या ठिकाणी तुरुंगवास काटत आहेत. नातेवाईक व आप्तेष्टांच्या भेटीमध्ये बोलताना अनेक कैदी तुरुंगातील करून कहाणी मांडत असताना त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात भीतीदायक वातावरण दिसून आले. तेंव्हा संभाजीनगर विभागाचे पोलीस आयुक्त याकडे गांभीर्याने लक्ष देणार का..? पोलीस खात्याच्या अगदी गुप्त स्टींग ऑपरेशन प्रमाणे वरिष्ठ कारागृह प्रशासन अधिकारी, पोलीस आयुक्त आणि पोलीस महासंचालक गुप्तरित्या याची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी

(उर्वरीत पान २ वर)

# कपिलधारवाडीच्या ग्रामस्थांचे जीव धोक्यात ; तातडीने पुनर्वसन करा-आ.संदीप क्षीरसागर

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, आपत्ती विभाग मंत्र्यांना दिले पत्र

बीड (प्रतिनिधी) मागील काही काळात सततच्या मुसळधार पावसामुळे व अतिवृष्टीमुळे कपिलधारवाडी येथे भूस्खलन झाले आहे. यामुळे गावकऱ्यांचा जीव धोक्यात असून त्यांचे तात्काळ पुनर्वसन करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

मौजे पाली ग्रामपंचायत अंतर्गत कपिलधारवाडी छोटेसे ९० कुटुंबाचे गाव वास्तव्यास आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे वातीवृष्टीमुळे सदरील गाव अतिशय गंभीर संकटात सापडले आहे. या ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे गावांमध्ये भूस्खलन सुरू झाले असून जमिनीत, डोंगराच्या कडेला, रस्त्यावर, शाळा खोली, घरे, मंदिरे, संरक्षण भिंत व इतर ठिकाणी मोठ्या भेगा व तडे गेले असून त्यात सातत्याने वाढ होत आहे. ग्रामस्थांना घरी जाणे धोकादायक झाल्याने ग्रामस्थांना, आबालवृद्धांना,महिला भगिनींना, शाळकरी विद्यार्थ्यांना, दिवस व रात्र आजच्या घडीला श्री. मन्मथ स्वामी देवस्थान, कपिलधार या ठिकाणी वास्तव्य करावी लागत आहे. त्यामुळे ग्रामस्थांना कायमस्वरूपी दिलासा देणे व तातडीने पुनर्वसन होणे आवश्यक आहे.



यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. जसे की, १) कपिलधारवाडी गाव तातडीने धोकाग्रस्त क्षेत्र घोषित करावे २) प्रभावित सर्व कुटुंबाचे तातडीने स्थलांतर व पुनर्वसन व्यवस्था करावी ३) कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी नवीन जागा व निवासी योजना जाहीर करून तात्काळ अंमलबजावणी व्हावी ४) शाळा व सार्वजनिक इमारतीची सुरक्षा तपासून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची पर्यायी व्यवस्था करावी ५) या सर्व कामांसाठी आपत्ती निवारण निधी नरेगा व पुनर्वसन विभागाचा निधी तथा इतर योजनेमधून निधी मंजूर करून ग्रामस्थांना यथोचित सहकार्य व्हावे अशा विविध मागण्यांचे पत्र आ. संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार, मदत व पुनर्वसन विभागाचे मंत्री मा.ना.मकरंद जाधव पाटील, आपत्ती विभाग मंत्री मा.ना.गिरीश महाजन यांच्यासह महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर, जिल्हाधिकारी, बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी जिल्हा आपत्ती व व्यवस्थापन, बीड, उपविभागीय अधिकारी बीड, तहसीलदार बीड, गटविकास अधिकारी पंचायत समिती बीड यांना पत्रव्यवहाराद्वारे केली आहे.

कपिलधारवाडी च्या ग्रामस्थांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी

बीड विधानसभा मतदारसंघातील

(उर्वरीत पान २ वर)

# भगवान गडावरील दसरा मेळावा हिरावून घेतला - पंकजा मुंडे



पाटोदा /प्रतिनिधी

सावरगाव - भगवान भक्तिगड येथे आयोजित दसरा मेळाव्यात कार्यकर्त्यांच्या गैरवर्तनावर मंत्री पंकजा मुंडे यांनी

(उर्वरीत पान २ वर)

### भगवान बाबांचा संदेश

भाषणाच्या शेवटी पंकजा मुंडे यांनी भगवान बाबांच्या शिकवणीची आठवण करून दिली. दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने जगा. कुणाचे तुकडे उचलू नका, खोटे धंदे करू नका. चांगल्या माणसाचं चांगलं होतं. भगवान बाबांचे आशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत, असे त्या म्हणाल्या.

# बीड जिल्हा रुग्णालयात महिलेची मोठी शस्त्रक्रिया यशस्वी

बीड /प्रतिनिधी


बीड शहरातील एमआयडीसी एरिया मध्ये राहणारी महिला अनिता (नाव बदललेले वय ४४ ) या मागील पाच वर्षापासून पोटाच्या त्रासाने त्रस्त होत्या. अंगावरचे जाणे, पोट दुखणे ,लघवी संडासला त्रास जाणवत होता. या महिलेने पोटाची सोनोग्राफी केली असता पोटात गर्भपिशवीवर मोठी गाठ दिसून आले . त्यांना रुग्णालय मध्ये दिनांक २८ सप्टेंबर व २९ सप्टेंबर रोजी तपासण्या झाल्यानंतर दिनांक



२९ सप्टेंबर रोजी जिल्हा रुग्णालय येथे ऍडमिट करण्यात आले. दिनांक ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी गंभीर शस्त्रक्रिया करून महिलेच्या पोटातून जवळपास पाच किलो मांसाचा गोळा ( फायब्रॉइड ) व गर्भपिशवी

(उर्वरीत पान २ वर)

# अबांजोगाई आगारा प्रमुख राऊत यांचा मनमानी कारभार..!


प्रति,
आगार व्यवस्थापक ,
रा.प.अंबाजोगाई आगार

विषय:- पोलीस वॉरंट शॉर्ट (कमी भरणा )बाबत.

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या आगारातील खालील यादितील वाहक यांनी पोलिस वॉरंट शॉर्ट (कमी भरणा ) केला आहे. सदर वाहकांना वारंवार रोखपाल यांनी तोंडी व दूरध्वनी द्वारे सूचना देऊनहि संबंधीत वाहकांनी पोलिस वॉरंट शॉर्ट (कमी भरणा ) ची रक्कम अद्यापपर्यंतही आगारात जमा केलेली नाही.

| अक्र | वाहकाचे नाव | बिल्ला क्र | रक्कम | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | एच एस गुट्टे | १३१९ | १७० | २३/०१/२०२५ |
| २ | आर ए दहिफळे | २२१२५ | ३६ | ३०/०१/२०२५ |
| ३ | एम पी घोरपडे | ९३३ | २३४ | १२/०२/२०२५ |
| ४ | जे बी कदम | २७४०४ | १०८ | २५/०२/२०२५ |
| ५ | एस एस फड | १६३ | १०२ | ५/०३/२०२५ |
| ६ | आर पी मुंडे | १५७०८ | १२२ | ७/०३/२०२५ |
| ७ | आर जी सलगरे | ८९३ | ५१ | ७/०३/२०२५ |
| ८ | डी जी जोशी | ३०१८७ | ८१ | १७/०३/२०२५ |
| ९ | एस ए तोंडे | २४८४ | १६ | १/०४/२०२५ |
| १० | आर टी जाधव | १३ | ३६ | २/०४/२०२५ |
| ११ | यु आर मुंडे | ३०४३२ | ११२ | ४/०४/२०२५ |
| १२ | जे बी कदम | २७४०४ | ६१ | ८/०४/२०२५ |
| १३ | आर जी सलगरे | ८९३ | १६ | १४/०४/२०२५ |
| १४ | व्ही व्ही नखाते | ३०८ | १०२ | १५/०४/२०२५ |
| | एकुण रक्कम | | १२४७ | |

तरी मा.साहेबांनी याबाबत मार्दर्शन करावे.
करिता आपल्या माहितीस्तव सादर.

## प्रवास पोलिसांचा दंड मात्र वाहकांना..!

अंबाजोगाई / सुनील शिरसाट

अबांजोगाई आगारातील वाहक कर्मचारी यांच्या कडून पोलीस कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या वॉरंट तिकिट सवलतीच्या रक्कमेची वसुली आगार प्रमुख यांनी चक्क वाहकांच्या पगारातून केल्याने वाहक कर्मचारी यांच्यात संतापाची लाट पसरली आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या साध्या

(उर्वरीत पान २ वर)

# समाजासाठी मी सतत लढलो, लढत राहणार - मनोज जरांगे पाटील

### समाज बुडेल असं वागू नका

आरक्षणासाठी झालेल्या संघर्षाची आठवण करून देताना ते म्हणाले, मी आणि गरीब मराठ्यांनी एका वर्षांत ५८ लाख लोकांना आरक्षण दिलं, तर दोन वर्षांत तीन कोटी मराठे आरक्षणात आले. मराठवाडा गॅझेटचा वापर करून आरक्षण पक्कं केलं. आपण जे मिळवलं आहे ते खूप आहे. आता समाजाने थोडं हुशारीने चाललं पाहिजे. गरम आहे की गार आहे, हे ओळखूनच खाल्लं पाहिजे. समाज बुडेल असं वागायला नको.



पाटोदा प्रतिनिधी - आरक्षण मिळालं आहे, आता कुणीही मागे हटू नका. मी किती दिवसांचा पाहुणा आहे हे माहित नाही. पण समाजासाठी सतत लढलो आणि जिंकलो. माझ्या समाजाच्या लेकरांसाठी माझं आयुष्य झिजवलं, अशा भावनिक शब्दांत मराठा आरक्षणाचे प्रणेते मनोज जरांगे पाटील यांनी नारायणगड येथे झालेल्या दसरा मेळाव्यात उपस्थित जनसमुदायाला हाक दिली.

या मेळाव्याला मठाधीपती शिवाजी महाराज यांच्यासह हजारो समाजबांधव उपस्थित होते. जरांगे पाटील यांच्या भाषणावेळी प्रचंड उत्साह आणि भावनिक वातावरण निर्माण झाले.

मी कधीही नाटक केले नाही

जरांगे म्हणाले, गरीब मराठा समाज होरपळत होता, ते मला बघवत नव्हते. मी कधीही नाटक केले नाही, समाजाला खोटं बोललो नाही. काही वेळा एखादी पावलं पुढे गेली असतील, काही चुका झाल्या असतील, पण हेतू नेहमीच शुद्ध होता. लेकीबाळांना मोठं करायचं असेल, तर

(उर्वरीत पान २ वर)

### भावनिक हाक

जरांगे पाटील शेवटी म्हणाले, मी थोड्या दिवसांचा पाहुणा आहे, पण माझ्या समाजातील लेकरांना नोकरी आणि शिक्षणात आरक्षण मिळालेलं माझ्या डोळ्यांनी पाहायचं आहे. आता कुणीही मागे हटू नका. तुम्ही साथ दिलीत, तर आपण आणखी मोठं यश मिळवू.या भावनिक भाषणाने नारायणगडच्या दसरा मेळाव्यातील जनसमुदाय स्तब्ध झाला आणि जरांगे पाटील यांच्या घोषणांना उपस्थितांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# आजही 'नकोशी'च!

सुंभ जळाला, तरी पीळ कायम' अशी मराठीत जी म्हण आहे, ती आज आपल्या समाजाला तंतोतंत लागू पडते. गोष्टी कालानुरूप फार वेगाने बदलत असतात. बदलत्या वास्तवाची जाणीव प्रत्येकालाच असते. सभोवतालच्या वास्तवानुसार बदलायला हवं; त्याशिवाय तरुणोपाय नाही याचंही भान असतं. पण, माणूस बदलाला सहजासहजी तयार होत नाही. परंपरा आणि संस्कारातून आलेल्या समजुतींबाबत तर हे जडत्व खूपच असतं. कालानुरूप मांडल्या जाणाऱ्या प्रागतिक विचारांना सुरुवातीला विरोधच असतो. त्यातली अपरिहार्यता लक्षात आल्यानंतर जेवढं आवश्यक, भौतिक जगण्याला उपयोगी - तेवढंच स्वीकारलं जातं. केवळ तेवढ्या स्वीकारावरून स्वतःचं प्रागतिक म्हणून समर्थनही केलं जातं. पण, ते मुळातून नसल्याने, जे स्वीकारलं ते वरवरचं असल्याने त्याचा लाभ तर होत नाहीच; पण फरपट मात्र होते. स्त्रीभ्रूण हत्येविरोधात सरकारी पातळीवर बऱ्याच मोहिमा झाल्या. स्त्री सुधारकांनी वेगवेगळ्या पातळीवर प्रबोधन करून झालं. त्याचे धोके सांगून झाले. ज्या कारणासाठी कुटुंबाला मुलगी ओझं वाटते, ती कारणं संपवण्यासाठी सरकारने विविध योजना आखल्या. महाराष्ट्रासारख्या राज्यात या योजनांची अंमलबजावणी शंभर टक्के दिसते. कागदावर लाभार्थींच्या याद्याही आहेत. पण, त्या योजनांचा लाभ घेतल्यानंतर मानसिकतेत किती फरक झाला? तर, अगदी जेमतेम. मग त्या योजनांचा उपयोग काय झाला? ज्या समाजसुधारकांनी समाजप्रबोधनासाठी आयुष्य वेचलं, सरकारने मोहिमांच्या प्रसिद्धीवर कोट्यवधींचा खर्च केला, प्रत्येक योजनेतूनही कोट्यवधींचा लाभ दिला, त्याचा उपयोग काय झाला? सगळं पालथ्या घड्यावर पाणी?

मुली शिकल्या, त्या स्वावलंबी झाल्या, शिक्षणाने त्यांच्या आणि कुटुंबीयांच्या बौद्धिकतेत-मानसिकतेत फरक पडला, तर त्याचा लाभ स्त्रियांकडे बघण्याच्या दृष्टिकोनात होईल. 'नकोशी' मुलगी 'हवीशी' होईल. 'मुलगी शिकली, प्रगती झाली'सारख्या घोषणांनी संपूर्ण राज्यात त्यासाठीच भिंती रंगवल्या होत्या. प्रसिद्धी माध्यमांतून जाहिराती दिल्या गेल्या होत्या. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावं, 'मुलाचं, की घरातल्या मुलीचं शिक्षण?' यात मुलींचं शिक्षण बाजूला पडू नये, यासाठी केंद्र सरकारने' बेटी बचाव-बेटी पढाव' ही महत्त्वाकांक्षी योजना आखली. त्यासाठी चांगल्या निधीची तरतूद केली. योजनेचा निधी केंद्रातून राज्यात, राज्यातून जिल्ह्याजिल्ह्यांत गेला, पण त्यानंतर तिथे तो खर्चच झाला नाही, अशी माहिती केंद्र सरकारच्या महिला आणि बालविकास विभागाच्या एका अहवालात देण्यात आली आहे. अहवालात म्हटलं आहे, की योजनेच्या गेल्या अकरा वर्षांत मूळ तरतुदीच्या एक तृतीयांश निधीही कधी खर्च झाला नाही! सन २०२४-२५ मध्येही ३१ डिसेंबरपर्यंत एकूण योजनेच्या फक्त १३ टक्के निधीच खर्च झाला आहे!! हा आतापर्यंतचा सर्वात कमी खर्च आहे.

देशाच्या तुलनेत महाराष्ट्रात परिस्थिती बरी आहे. पण, ज्या राज्यात याची सर्वाधिक गरज आहे, तिथेच अगदी खालच्या स्तरावर उदासीनता दिसते आहे. अगदी खालच्या स्तरावर असलेली उदासीनता ही प्रशासकीय पातळीवरची उदासीनता असते. या स्तरावरील अधिकारी आणि कर्मचारी वर्ग म्हणजे समाजाच्या पारंपरिक मानसिकतेचं प्रतीक असतो. त्यांच्या मानसिकतेवर आणि कार्यक्षमतेवरच कोणत्याही योजनेची अंमलबजावणी आणि यश अवलंबून असतं. त्यामुळे, योजनेच्या माध्यमातून समाजात कोणताही बदल घडवायचा असतो, तेव्हा या पातळीवरच्या प्रशासनिक यंत्रणेचं प्रबोधन, संवेदनीकरण फार महत्त्वाचं असतं. या योजनेच्या अंमलबजावणीत राष्ट्रीय पातळीवर कुठे कमतरता दिसते आहे, ते शोधून तिथल्या कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण वर्ग तातडीने आयोजित केले पाहिजे. त्यांच्या दृष्टिकोनात बदल होणार नाही, तोपर्यंत योजनेच्या अंमलबजावणीला गती येणार नाही. गती येणार नाही, तोपर्यंत तिची प्रभावी अंमलबजावणी होणार नाही. अंमलबजावणी झालीच नाही, तर मुलींच्या शिक्षणाला, तिच्या आत्मनिर्भर होण्याला जो रेटा द्यायचा आहे, तो मिळणार नाही. हा रेटा प्रत्यक्ष कुटुंबापर्यंत पोहोचलाच नाही, तर मुलगी 'नकोशी'च राहील आणि त्यामुळे स्त्रीभ्रूणहत्या होतच राहतील.

# प्रेरणा लोकसंचलित साधन केंद्राची

## १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा संपन्न

बीड /प्रतिनिधी

प्रेरणा लोकसंचलित साधन केंद्र, केजची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी श्रीराम मंगल कार्यालय, रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ, केज येथे महिला व बाल विकास विभागांतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ, नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्योग विकास प्रकल्प अंतर्गत प्रेरणा लोकसंचलित साधन केंद्राची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला मेळावा सी.एम.आर.सी.च्या अध्यक्षा मंडाबाई पाटोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्षा सिता बनसोड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी महिला सक्षमीकरण व बालविवाह निर्मूलनाविषयी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

सभेस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव, विजय काकड, सखी वन स्टॉप सेंटरच्या शांता खांडेकर, आय.सी.आय.सी.आय बँकेचे महेश अंजान, बँक ऑफ महाराष्ट्राचे योगेश कांडले, माविम जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप, लेखा अधिकारी गजानन ढोणे, जिल्हा प्रकल्प सल्लागार सागर इंदुरकर, एम.आय.एस. सल्लागार नरेश कुरापाटी यांच्यासह सी.एम.आर.सी. पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व केज प्रेरणा महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती.

स्वागत व प्रस्तावना व्यवस्थापक रामकुवर आंधळे यांनी केली. वार्षिक अहवाल व लेखा परीक्षण अहवाल लेखा अधिकारी गजानन ढोणे यांनी सादर केला.

कार्यक्रमात योगेश कांडले यांनी महिलांसाठी उपलब्ध बँकिंग योजना, सूक्ष्म वित्त, बचत व गुंतवणूक याबाबत मार्गदर्शन केले. शांता खांडेकर यांनी महिला व बालविकास विभागाच्या योजनांची माहिती दिली. किरण जाधव व विजय काकड यांनी उद्योग उभारणी, नोंदणी व कर्जसुविधांबाबत मार्गदर्शन करून उद्योजकतेकडे महिलांनी वळावे, असे आवाहन केले. जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी ऋढच् कार्यक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांचे सादरीकरण केले.सभेत लाभार्थी महिलांशी गटचर्चा घेऊन फीडबॅक फॉर्म भरून घेण्यात आले. उत्कृष्ट उद्योजिका, माविम मित्र यांचा जेन्डर चॅम्पियन म्हणून सत्कार तसेच उत्कृष्ट महिला बचत गटांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वंदना शिंदे यांनी केले.

# सात दिवसात मोक्ष प्राप्त करुन देणारा भागवत ग्रंथ आहे-भागवताचार्य समाधान शर्मा

## माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भागवत कथेस उस्फूर्त प्रतिसाद





गेवराई (प्रतिनिधी) शिवछत्र परिवाराने पावसात अडकलेल्या लोकांना, शेतकऱ्यांना मदत केली ही रिल नाही तर रियल काम असून शिवछत्र परिवाराकडून गेल्या चार वर्षांपासून गेवराई तालुक्यातील जनतेला आनंद देण्यासाठी शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आनंद आणि वैभवाचे सोहळे आयोजित केले जात आहेत असे गौरवोद्गार काढून सात दिवसात आपल्याला मोक्ष प्राप्त करुन देणारा ग्रंथ भागवत ग्रंथ आहे असे प्रतिपादन भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांनी केले.

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या भागवत कथा आणि किर्तन महोत्सवाला आज थाटामाटात प्रारंभ झाला. प्रारंभी शारदा विद्यामंदिराच्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या मिरवणूकीतून भागवताचार्य समाधान महाराज शर्मा यांचे शिवनगरीत आगमन झाले. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी अभिष्टचिंतन सोहळा समितीच्या वतीने समाधान शर्मा यांचे स्वागत केले. याप्रसंगी दत्त संस्थान शिंपेगावचे महंत ह.भ.प. हनुमान महाराज, ह.भ.प. बप्पा महाराज राऊत, माऊली संस्थान बोरी पिंपळगाचे ह.भ. प. नामदेव महाराज यांच्या हस्ते कलश, भागवत ग्रंथ आणि भगवान श्रीकृष्ण यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.यावेळी समाधान शर्मा यांनी आपल्या अमोघ वाणीतून कथा प्रस्तुत करुन उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. यावेळी माजी मंत्री शिवाजीराव पंडित, शिव शारदा मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पत्रकार आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आरतीने कथेची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. कथा प्रवक्ते समाधान महाराज शर्मा यांना संतोष शर्मा (किबोर्ड), सागर कांबळे ( गायक आणि हार्मोनियम), सारंग भोसले (सितार), सुदाम गुणाले(ढोलक), ओम राऊत (पखवाज), कृष्णा आते( पॅड), भागवत शिरफुले (तबला) यांनी संगीत साथ दिली.

यावेळी शिवाजीराव (दादा) पंडित अभिष्टचिंतन सोहळा समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. अभिष्टचिंतन सोहळ्यातील भागवत कथा आणि किर्तन महोत्सवाला उपस्थित राहुन भक्ती आणि शक्तीचा आस्वाद घेण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले.

**कार्यालय नगरपंचायत तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, तीर्थपुरी**
जा.क्र.२०२५/नपतो/ जा.प्र.ना.वि./कावि- २४४३
दिनांक : ०१/१०/२०२५

**जाहिर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार ज्योती दत्तात्रय बहिर रा. एकलहेरा ता. अंबड जि.जालना यांनी गट नं.(-) सिटी सर्वे नं. (-) ग्रा.पं.कालिन नगरपंचायत मिळकत क्र. ४६४५ क्षेत्र ११०० चौ.फु. जागा नामे रामप्रसाद हरिनारायण तोष्णीवाल रा. तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर खरेदीखत खरेदीखत दस्त क्र. ३९१३/२०२५ दि. २३/०७/२०२५ अन्वये खरेदी केली आहे.

खरेदी खरेदीखत सत्यप्रत जोडुन आवक क्र. (२०३८) दिनांक १४/०८/२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे. तेव्हा रामप्रसाद हरिनारायण तोष्णीवाल रा.तीर्थपुरी ता. घनसावंगी जि. जालना यांच्या नावावर असलेले गट नं. (-) सिटी सर्वे नं. (-) ग्रा.पं.कालिन नगरपंचायत मिळकत क्र. ४६४५ क्षेत्र ११०० चौ.फु. म्हणजेच १०२.१९ चौ.मी. ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व -शंकर बोबडे यांची जागा
पश्चिम - २५ फुट रुंदीचा रस्ता
दक्षिण -न.पं. मिळकत नं. ४६४४
उत्तर - न.पं. मिळकत नं. ४६४६

या वरील चतुः सिमा मधील क्षेत्र १०२.१९ चौ.मी. सहन जागा खरेदीखत पत्रा आधारे नामांतर करणे बाबत काही उजर आक्षेप / तक्रार असल्यास सदर जाहिरप्रगटन प्रसिध्द झाल्यापासून या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचे काहीही म्हणने नाही, असे समजून नामांतर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत नगर पंचायत तीर्थपुरी**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९३२ दि.३०.०९.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान राम साहेबराव बर्डे, रा.डोमेगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | राम साहेबराव बर्डे | स्वतः | २५.०९.१९८९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३०/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय**
**(दंड - विभाग )**
**ता. आष्टी जि.बीड**
**क्र.२०२५/दंड.विभाग/जन्म-मृत्यू/कावी- दि. स्वक्षरी खालील**

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (३) अन्वये

सर्व जनतेस मौजे. हातोला. ता. आष्टी. यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार श्री. विजय भगवान खाडे रा. हातोला ता. आष्टी जि.बीड यांनी त्यांचे स्वतः नामे. विजय भगवान खाडे यांची जन्म दि.०७/०३/१९९६ रोजी मौजे. हातोला. ता. आष्टी येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे स्वतः यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०२/०९/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत / -**
**तहसीलदार,आष्टी**

पान १ वरून...

**ओपन ओबीसी वाद...**

समोर आणून दाखवली तर सरकार ज्या पद्धतीने आरक्षणाची सोडत करत आहे त्यावर टाच येईल आणि ज्या प्रवर्गात कधीच एससी एसटी साठी आरक्षण पडले नाही त्या प्रवर्गात आता आरक्षण पडणे गरजेचे असताना ते थांबून सरकार पुन्हा आहे त्याच प्रवर्गामध्ये आरक्षण देऊन एक प्रकारे जो अन्याय करणार आहे ते थांबवता येणे शक्य आहे.

मात्र यासाठी आरक्षणामध्ये अभ्यास असलेल्या तज्ञ व्यक्तींनी संपूर्ण ताकतीने सरकारच्या या धोरणाविरुद्ध न्यायालयाचे डोळे उघडणे गरजेचे बनले आहे. तरच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये एससी एसटी प्रवर्गावर होणारा एक प्रकारे अन्याय थांबेल आणि त्यांना न्याय मिळेल हे वास्तव नाकारून चालणार नाही. मात्र या महाशक्ती पुढे जनशक्तीचा रेटा दाखववा लागेल. समाजाला पुढे यावे लागेल. तरच या राजकीय वादामध्ये येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेत खऱ्या अर्थाने एससी आणि एसटी प्रवर्गावर होणारा अन्याय थांबेल आणि या समाजाला राजकीय सत्तेतील वाटा खऱ्या अर्थाने मिळेल. अन्यथा अन्यायच होईल यात शंका नाही.

**कपिलधारवाडीच्या ग्रामस्थांचे ...**

ग्रामपंचायत मौजे पाली अंतर्गत असलेले कपिलधारवाडी हे अंदाजे ९० कुटुंबांचे रहिवाशी गाव वसलेले आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने व यापूर्वी देखील संरक्षण भिंत,रस्ता व इतर व्यवस्थेला धोका निर्माण झाल्याने सन २०२२-२३ ते आजतागायत याविषयी आ. संदीप क्षीरसागर यांनी सातत्याने यथोचित पत्र व्यवहार व उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी करत आहेत. त्यातच ३० सप्टेंबर २०२५ रोजी रात्री उशिरा रस्ता,शाळा खोली, डोंगराचा काही भाग, घरांना मोठ्या प्रमाणात तडे जाण्याचे काम झाले आहे. त्या तळ्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. अशावेळी ग्रामस्थांना शासन व प्रशासन यांच्याकडून सर्वरित्या सहकार्य होणे गरजेचे असून याबाबत उचित कार्यवाही सुरू आहे. सर्व कुटुंबाची तात्पुरती व्यवस्था श्री. मन्मथ स्वामी देवस्थान, कपिलधार येथे होणे आवश्यक आहे. प्रशासनाने पंच कमिटी श्री. कपिलधार यांना याबाबतीत अवगत करावे. जेणेकरून पंच कमिटी कडून गावकऱ्यांना याबाबतीत यथोचित सहकार्य होईल व त्याचबरोबर ग्रामस्थांच्या हाताला काम, विद्यार्थ्यांना शाळा व भोजन व्यवस्था होईल. याबाबत प्रशासनाकडून आदेश काढण्यात यावेत.

**बीड कारागृहामध्ये ..**

करणार काय आणि कारागृहातील गोष्टी बाहेर मीडियापर्यंत गेल्याच्या भीतीने कारागृहातील अधिकारी कर्मचारी संबंधित मारहाणीचे व इतर गैरकर त्याचे सीसीटीव्ही फुटेज गायब करणार नाहीत हे कशावरून.? केव्हा संबंधित सीसीटीव्ही डाटा कारागृह वरिष्ठ प्रशासन तात्काळ ताब्यात घेऊन ते ग्रह खात्याकडे सुपूर्द करणार का.? हेही या ठिकाणी अत्यंत महत्त्वाचे आहे. वरिष्ठांनी याकडे लक्ष देण्या अगोदर बीड जिल्ह्याचे दबंग जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन या प्रकरणाच्या अनुषंगाने एकंदरीत बीडच्या कारागृहातील या नंगानाचाकडे वैयक्तिक लक्ष देऊन याची सखोल-पारदर्शक चौकशी करणार का.? याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून या प्रकरणात नेमकी आता पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकारी काय कारवाई करणार हे पाहणे आता औत्सुक्याचे राहील..!

**भगवान गडावरील..**

संताप व्यक्त केला. तुम्ही अशा प्रकारे वागणार असाल तर मला कठोर व्हावे

पान १ वरून...

लागेल. हुल्लडबाजी करणारे माझे लोक असू शकत नाहीत. अगोदर भगवान गडावरील माझा मेळावा हिरावून घेतला, आता हा मेळावाही बंद पाडायचा आहे का? असा थेट सवाल त्यांनी कार्यकर्त्यांना केला.

सावरगाव येथे झालेल्या या मेळाव्याला मंत्री पंकजा मुंडे यांच्यासोबत आ.धनंजय मुंडे, डॉ. प्रीतम मुंडे, रयत क्रांती संघटनेचे नेते महादेव जानकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

हा फाटक्या माणसांचा मेळावा आहे

आपल्या भाषणात मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, तुमचं भगवान बाबांवर खरं प्रेम असेल तर असं वर्तन अपेक्षित नाही. हा शोभेचा नाही तर फाटक्या माणसांचा, संघर्ष करणाऱ्यांचा आणि गोपीनाथ मुंडेंचा वारसा जपणाऱ्यांचा मेळावा आहे. त्यांनी शायरीच्या ओळींतून भावना व्यक्त करत सांगितले - विरासत में संघर्ष मिला है, तो जिद भी मिली है लड़ने की

शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं राहण्याची ग्वाही

शेतकऱ्यांच्या हालअपेष्टांवर बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावतीने शब्द देते - शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभं राहू, पूर्ण मदत केली जाईल.

जातीपातीवर मात, माणुसकीचा धागा

आपल्या समाजकार्याचा दाखला देताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, मी बौद्ध समाजातील घरात गेले, तर वंजारा समाजाचा माणूस मदतीला धावला. कैकाडी समाजालाही मदत केली. यातून जाती गळून पडतात, माणुसकीचं नातं घट्ट होतं.

**बीड जिल्हा रुग्णालयात ..**

सहित काढण्यात आले.

जिल्हा रुग्णालय बीड चे शल्य चिकीसक डॉ संजय राऊत अतिरिक्त शल्य चिकित्सक डॉ संतोष शहाणे, व डॉ शेख फरिदा स्त्री रोगतज्ञ ( वर्ग ०१ ) यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोठी शस्त्रक्रिया यशस्वी रित्या झाली. अशा गंभीर शस्त्रक्रिया खाजगीत करायची असल्यास ७० ते ८० हजार रुपये खर्च येत असल्याचे सांगण्यात येते, परंतु जिल्हा रुग्णालय बीड येथील डॉ सावंत, कोठुळे भूलतज्ञ, ओटीब्रदर श्री घुले यांनी ही शस्त्रक्रिया डॉ शेख फरीदा ( स्त्रीरोग तज्ञ, वर्ग ०१ ) यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पाडली. जिल्हा रुग्णालय बीड येथील या टीम बद्दल नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे.

**अबांजोगाई आगारा ..**

व निम आराम बसमधी पोलीस कर्मचारी यांना वॉरंट तिकिटाची सवलत लागू आहे, सदरच्या सवलती प्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रात भर वाहकांकडून पोलीस कर्मचाऱ्यांना वॉरंट तिकीट देऊन प्रावासाची मुभा दिली जाते,परंतु एढखच् मशिनच्या तांत्रिक दोषामुळे वाहकांनी पोलिस वॉरंटचे एकदा दिलेले तिकीट परत वेगळ्या थांब्यावरून वेगळ्या रक्कमेचे दिलेले दाखवत आहे, सदरची बाब कामगार संघटना प्रतिनिधी नी विभागिय अधिकारी यांच्या समक्ष आगार प्रमुख यांच्या निदर्शनास आनुन देऊन वाहकांकडून वसुली न करण्याचे तोंडी आदेश दिले होते, तरीही वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत श्री.राऊत यांनी बेकायदेशीर रित्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारची कल्पना न देता तब्बल १४ वाहक कर्मचारी यांच्या पगारातून १२४७ ची वसुली केली

पान १ वरून...

आहे, त्यामुळे सदच्या मनमानी कारवाई मुळे आगारातील वाहक कर्मचारी यांच्याकडून संताप व्यक्त केला जात आहे, या निमित्ताने आगाराचा मनमानी कारभार परत एकदा चव्हाट्यावर आल्याचे दिसून येते.

**समाजासाठी मी सतत ...**

शेतीसोबत आरक्षणाचाही आधार देणं गरजेचं होतं. त्यासाठी रात्रंदिवस झटत राहिलो. सहा कोटी मराठ्यांची लेकरं सुखी राहावीत यासाठी आयुष्य खर्ची घातलं.

तुमच्याशी गद्दारी करून मोठा झालो असतो

भाषणात त्यांनी समाजातील नेत्यांवर थेट टीका केली. अनेक नेत्यांनी सातारा संस्थान आणि हैदराबाद गॅझेटच्या कारणावरून आरक्षण द्यायला विरोध केला. कुणी म्हणाले यामुळे राज्य संकटात येईल. पण मी समाजाशी गद्दारी केली नाही. जीव धरणीला टेकला तरी मागे हटलो नाही. ४५ वर्षांच्या लढाईत अनेक जण पांढरे कपडे घालून गाड्यांत फिरले, टीव्हीवर बोलले, पण काही साध्य झालं नाही. मी मात्र तळागाळातल्या लोकांसाठी उभा राहिलो.

### जिल्हाधिकारी यांच्या हस्ते १९१ गट क व ड पदाच्या

# उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरीत करण्यात येणार

**बीड : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने लिपिक टंकलेखक पदावरील नियुक्तीसाठी शिफारस केलेले उमेदवार तसेच नविन अनुकंपा धोरणानुसार गट क व गट ड मध्ये नियुक्त होणाऱ्या सर्व उमेदवारांना नियुक्तीपत्रे वितरणाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम दि.०४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आयोजीत करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान तसेच जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.**

या कार्यक्रमात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून लिपीक टंकलेखक पदासाठी शिफारस करण्यात आलेले एकूण ७७ उमेदवार तसेच नविन अनुकंपा धोरणानुसार गट क संवर्गातील एकूण ५१ उमेदवार तर गट ड संवर्गातील एकूण ६३ उमेदवारांना नियुक्तीपत्रे वितरीत करण्यात येणार असून या कार्यक्रमासाठी संबंधीत सर्व नियुक्ती प्राधिकारी आणि नियुक्त झालेले सर्व उमेदवार यांना उपस्थित राहणे आवश्यक आहे.

तरी या कार्यक्रमासाठी सर्व कार्यालय प्रमुख तसेच सर्व संबंधीत उमेदवार यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# म. गांधीजींचा अर्थविचार पर्यायी जीवन शैलीचा जाहीरनामा–श्री. यमाजी मालकर



किल्ले धारूर : येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापुरुषांच्या जयंती निमित्ताने ऑनलाइन इतिहास विभाग, सांस्कृतीक विभाग व एनएसएस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वर्तमान आणि महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार या विषयावरील व्याख्यानातून विचार व्यक्त करताना श्री. यमाजी मालकर म्हणाले, महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार पर्यायी जीवनशैलीचा जाहीरनामा होता. म. गांधीजींनी माणूस यंत्राचा गुलाम होऊ नये यासाठी खादी, चरखा यांचे महत्व कृतीतून समाजाला पटवून दिले. एकेकाळी भारत जगात समृद्ध देश होता. कापड, मसाला यांचे उत्पादनात अग्रेसर होता. भारतातील संपन्नता व समृद्धीच्यामुळेच इंग्रज भारतात आले. भारतातील कच्चा माल इंग्लंडला नेऊन तलम व सुंदर कापड तयार करून भारतात विकले. व्यापाराच्या भूमिकेतून ब्रिटिशांनी भारतावर दीडशे वर्षे राज्य केले. त्यांनी वस्त्रोद्योग, सुतगिरणी, रेल्वे यांचे जाळे भारतात निर्माण केले. म. गांधीजींचा अर्थविचार हा जीवन विचार होता. मानवी शरीर यंत्र असून बुद्धी व मन हे यंत्राचे भाग आहेत. त्यास काम मिळाले तर ते अद्ययावत राहतात. भांडवलशाही देवाणघेवाण यामध्ये यांचा महत्त्वाचा भाग असल्याचे सांगितले. आज माणूस यंत्राचा गुलाम होत आहे. एआय तंत्रज्ञान यावर बोलतानाही त्यांनी यामुळे मन, बुद्धी आणि शरीर अकार्यक्षम होईल असे सांगितले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी महात्मा गांधीजींच्या विचारांची भारतालाच नव्हे तर जगाला आवश्यकता आहे. महत्माजींचे विचार व्यक्तीला स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनविणारे होते असे सांगितले. महापुरुषांच्या जयंतीनिमित्ताने महाविद्यालयातील एनसीसीच्या कॅडेट्सनी परिसरामध्ये स्वच्छता करून स्वच्छतेचा संदेश दिला. आयोजित ऑनलाइन व्याख्यानासाठी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर डॉ. डी. बी. जाधव, प्रा. बी. एस. जोगदंड, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार तसेच सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, एनसीसी कॅडेट्स व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय डॉ. राहुल साळवे यांनी तर आभार डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी मानले.

# दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर श्री. राधेश्यामजी चांडक यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात फळवाटप



अंबड /प्रतिनिधी :-
विजयादशमीच्या मंगलमय दिवशी आणि बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्री.राधेश्यामजी चांडक यांच्या ७५ व्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालय अंबड येथे रुग्णांना फळवाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला.

समाजसेवेची नाळ जपत आयोजित या उपक्रमामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर उमटली. दयाळू आणि सेवाभावी कार्यातून समाजासाठी बांधिलकीची परंपरा जपण्याचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.या प्रसंगी विभागीय व्यवस्थापक श्री. प्रभाकरजी कोलते, शाखा व्यवस्थापक श्री. राजेश वैद्य, बंडू कावळे, प्रदीप सूर्यवंशी विभागीय व्यवस्थापक धर्माबाद, कल्याण पैठणी असिस्टंट, ऋषी कराळे, आकाश काळे, रामेश्वर जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमास उपजिल्हा रुग्णालयाचे मा.वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरमवाड,डॉ. सिद्दिकी, डॉ.बनसोडे तसेच रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या फळवाटप उपक्रमातून बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने समाजाभिमुख कार्याचा आदर्श घालून दिला असून दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर झालेला हा उपक्रम रुग्णांच्या चेहऱ्यावर समाधान आणि हसू फुलवणारा ठरला.

# मंठ्यात बाल कीर्तनकारांसाठी शारदीय कीर्तन महोत्सव



मंठा /प्रतिनिधी
येथील ज्ञानराज वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने नवरात्रीच्या निमित्ताने बाल कीर्तनकारांसाठी शारदीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने बाल कीर्तनकारांना कीर्तन सेवेसाठी सिद्ध करण्याची अनोखी परंपरा जोपासली जाते

येथील रेणुका देवी मंदिर परिसरात दरवर्षी नवरात्र महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. नवरात्रात मराठवाड्यासह दूरवरचे भाविक मोठ्या श्रद्धेने रेणुका देवीच्या दर्शनासाठी येत असतात. यानिमित्ताने देवीच्या माळावर नऊ दिवस विविध धार्मिक विधी आयोजित केले जातात. देवी भागवत, देवीची महाआरती, गोंधळ, संबळ वादन, छबिना, अष्टमीला होम हवन यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळते. देवी माळावर नऊ दिवस यात्रा भरवली जाते. रेणुका देवीच्या पायथ्याला असणाऱ्या ज्ञानराज वारकरी शिक्षण संस्थेमध्ये या निमीत्ताने नऊ दिवस बाल किर्तनकार आपली कीर्तन सेवा देत आहेत. संस्थेचे संस्थापक ह. भ.प.रामेश्वर महाराज नालेगावकर यांच्या पुढाकारातून हा अनोखा बाल किर्तन महोत्सव घेतला जात आहे. या कीर्तन महोत्सवांमध्ये हभप आदित्य महाराज सानप, ईश्वर महाराज थोरात, कार्तिक महाराज जाधव, गोवर्धन महाराज काळे, सुखदेव महाराज शिंदे, जयराम महाराज गाडेकर, निखिल महाराज शिंदे, गणेश महाराज शिंदे, महेश महाराज झोल, या बाल कीर्तनकारांनी दररोज आपली कीर्तन सेवा दिली. बुधवार (ता.१) रोजी ह.भ.प चेतन महाराज शिंदे यांच्या काल्याच्या कीर्तनाने बाल किर्तनकार महोत्सवाची सांगता झाली आहे.विशेष म्हणजे या कीर्तन महोत्सवासाठी गायनाचार्य व मृदंगाचार्य म्हणून वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी आपली सेवा देत आहेत. परमेश्वर महाराज आतकरे, एकनाथ महाराज साकळे, अनिकेत महाराज राऊत यांनी गायनाचार्य म्हणून तर समाधान महाराज ताठे, महेश महाराज ढवळे, ईश्वर महाराज ढवळे आणि राधिका नालेगावकर या मृदंगाचार्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. ज्ञानराज वारकरी शिक्षण संस्थेचे सर्व विद्यार्थ्यांनी महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले आहेत. वास्तविक यासंथेला कोणतेच शासकीय किंवा स्थानीय अर्थ सहाय्य मिळत नाही तर संस्था चालक नालेगावकर महाराज आपल्या कीर्तन प्रवचनात मिळालेल्या मानधनातून वप्राप्त शुल्कातून संस्थेच्या संस्थेच्या सर्व सुख सोयी उपलब्ध करून देतात अभिमानाची बाब म्हणजे या संस्थेतून पारंगत झालेले बरेच विद्यार्थी नामी कीर्तनकार बनले आहेत अशा प्रकारच्या महोत्सवातून उद्याचे आघाडीचे कीर्तनकार निर्माण व्हावेत अशी अपेक्षा ह.भ.प रामेश्वर महाराज नालेगावकर यांनी व्यक्त केली.

पावसामुळे झालेल्या शेती नुकसानीची मा.उपविभागीय अधिकारी बी.सर्वनन यांची

# जाफराबाद तालुक्यात प्रत्यक्ष पाहणी शेतकऱ्यांना दिलासा




जाफराबाद /हरी भालके :-
जाफराबाद तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या गंभीर परिस्थितीचा तात्काळ आढावा घेण्यासाठी मा. उपविभागीय अधिकारी भोकरदन (ख-ड) श्री.बी.सर्वनन यांनी दि.१ऑक्टोबर रोजी तालुक्यातील विविध गावांना भेट देऊन प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली.

या पाहणीदरम्यान श्री. सर्वनन यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.सोनखेडा पाझर तलाव परिसरातील सोनखेडा, सावरखेडा (गों.) व वरुड (बु.) येथे सोयाबीन व कपाशी पिकाचे मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान प्रत्यक्ष पाहिले.

नळविहीरा परिसरात, पूर्णा नदीकाठच्या शेतांमध्ये पाणी साचल्याने सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.देवळेगव्हाण शिवारात पावसासोबतच वाऱ्यामुळे ऊस पिकाचे गंभीर नुकसान झालेले दिसले.

घाणखेडा गावात,केळना नदीकाठावर कपाशी पिकात पाणी साचल्याने मोठे नुकसान झाल्याची पाहणी करण्यात आली.या ठिकाणी झालेल्या पाहणीदरम्यान मा. उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित महसूल व कृषी अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामे करून अहवाल सादर करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या.

शेतकऱ्यांच्या हतबलतेची दखल घेत श्री. सर्वनन यांनी त्यांना दिलासा देत सांगितले की

प्रशासन आपल्या पाठीशी आहे कोणत्याही शेतकऱ्याला एकटे सोडले जाणार नाही.या पाहणीमुळे शेतकऱ्यांमध्ये आश्वासक भावना निर्माण झाली असून प्रशासनाकडून त्वरीत मदत व नुकसानभरपाई मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गुरुकुलम् शिशुवाटीकेत दहा विकृतींचा 'रावण' जाळून सामाजिक जनजागृती

## वाईट प्रथांचा रावण जाळून लहानग्यांकडून समाजाला जागृतीचा संदेश



बदनापूर / प्रतिनिधी
दसऱ्याच्या दिवशी पारंपरिक रावणदहनाला नवा सामाजिक संदेश देत गुरूकुलम् शिशुवाटीकेतील लहानग्या बालविद्यार्थ्यांनी 'दहा विकृतींच्या रावणाचे दहन' केले.या आगळया-वेगळया उपक्रमात रावणाच्या दहा मस्तकांवर बालविवाह, स्त्रीभ्रूण हत्या, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा, पर्यावरण प्रदूषण, अपघातांतील बेफिकिरी, शैक्षणिक दुर्लक्ष, सायबर गुन्हे, स्त्री-पुरुष भेदभाव आणि भ्रष्टाचार अशा दहा कुरूप प्रवृत्ती दाखवल्या होत्या.

रावणदहनापूर्वी प्रत्येक विकृतीवर विद्यार्थ्यांनी छोटा संवाद सादर केला. आम्हाला खेळायचं आहे, लग्न नको असा बालविवाहाविरोधातील संवाद विद्यार्थ्यांनी म्हटला, तर मुलगी वाचवा - मुलगी शिकवा या घोषणांनी परिसर दुमदुमला. यावेळी पर्यावरणाच्या संरक्षणावरही मुलांनी भर दिला. प्लास्टिक बंद करा - झाडे लावा, जीव वाचवा अपघातांतील बेफिकिरीवर एका लहानग्याने हेल्मेट हातात धरून सांगितले, हेल्मेट नाही तर जीव नाही. लहानग्या वयात सामाजिक प्रश्नांवर अशी जाणीव निर्माण होत असेल तर उद्याची पिढी नक्कीच जागरूक होईल,गुरूकुलम् शिशुवाटीकेच्या या अभिनव उपक्रमामुळे पारंपरिक उत्सवाला सामाजिक उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला .यावेळी उपस्थिती शाळेचे व्यवस्थापक नवनाथ गव्हाणे,शिक्षीका अश्विनी डिघे, योगिता सिरसाठ, आलेश कांबळे , उपस्थित होते.

रावणाला दहा मस्तके होती, पण आज आमच्या लहानग्या विद्यार्थ्यांनी त्या दहा मस्तकांवर समाजाला पोखरणाऱ्या दहा वाईट प्रवृत्ती दाखवल्या. त्या जाळून त्यांनी जणू नवीन विचारांचा दीप प्रज्वलित केला. बालविवाह, व्यसन, भ्रष्टाचार, स्त्रीभ्रूण हत्या अशा समस्या फक्त पुस्तकात न शिकता मुलांनी संवादातून मांडल्या आणि समाजासमोर आरसा धरला. मला सर्वात मोठा आनंद हा आहे की इतक्या लहान वयात मुलांमध्ये चांगल्या-वाईटाची जाण निर्माण होत आहे. या छोट्या पावलातून उद्या समाज मोठा बदल घडवेल, अशी खात्री आजच्या उपक्रमाने दिली आहे. शिक्षण हे फक्त ज्ञानापुरते नसून संस्कारांचे बीज रोवणारे असते, याचे जिवंत उदाहरण आज आम्ही अनुभवले. - अश्विनी डिघे (शिक्षिका)




# स्वामी विवेकानंद महाविद्यालय मंठा विद्यार्थिनीचा केंद्रीय युवक महोत्सवात यश

मंठा /प्रतिनिधी
स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा येथील विद्यार्थिनी कु. पूजा विनायकराव कुलाल हिने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आयोजित केंद्रीय युवक महोत्सव २०२५ मध्ये भारतीय सुगम गायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून महाविद्यालयाला मानाचे स्थान मिळवून दिले.

पूजा सध्या कला शाखेत द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अडचणींवर मात करत तिने आपल्या जिद्दी व कलेच्या जोरावर विद्यापीठ स्तरीय स्पर्धेत ठसा उमटवला.या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आशाताई आकात, सचिव कपिलभैया आकात, उपाध्यक्ष कुणालदादा आकात, प्राचार्य डॉ. माणिकराव थिटे, उपप्राचार्य डॉ. सुधाकर जाधव, डॉ. सदाशिव कमळकर, प्रा. संभाजी तिडके यांनी कौतुक केले. तिच्या यशामागे आई-वडिलांची मोलाची साथ लाभली आहे.तसेच सांस्कृतिक समन्वयक डॉ. दक्षता देशमुख, संघ व्यवस्थापक डॉ. राजेंद्र काकडे, डॉ. संतोष वानखेडे व डॉ. तुषार धोंडगे यांनी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले.

# जाफराबाद तालुक्यात सततच्या पावसानं फळपिकांचं मोठं नुकसान

## पंचनामे करून नुकसान भरपाई द्या - संजय मोरे पाटील

जाफराबाद /हरी भालके
जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यात सततच्या पावसाने इतर पिकांसह फळ पिकांचही मोठं नुकसान झालं असून या नुकसानग्रस्त फळबागांचे तात्काळ पंचनामे करून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्यात यावी अशी मांगणी ग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी केली आहे.



बुधवारी दि.१श्री. संजय मोरे पाटील यांनी जाफराबादच्या तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की यावर्षी मे महिन्यापासून ते सप्टेंबर महिन्यांपर्यंत सतत पाऊस सुरू होता. त्यामुळे या फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सततच्या पावसाने आंबा पिकाला ताण बसला नाही. त्यामुळे अद्याप पर्यंत आंब्याला मोहराची काडी तयार झाली नाही. लिंबू पिकाला ताण बसला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे तेही उत्पन्न बुडाले आहे. पेरू पिकाचीही तीच अवस्था आहे. सततच्या पावसाने आवळा पिकाचा मोहोर झडल्याने त्याला अल्पप्रमाणात फळे लागली आहेत.

सर्वात जास्त कठीण अवस्था सीताफळ या फळपिकाची झाली आहे. सततच्या पावसाने सीताफळाला फुले लागली नाहीत. जी लागली ती टिकली नाहीत. जी टिकली ती बुरशीने काळी पडून गळून गेली. त्यातही थोडेफार आलेली फळे झाडावरच पिकून खाली गळून पडली. राहिलेली फळे झाडावरच तडकली. यामुळे फळबागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या सर्व नुकसानग्रस्त फळबागांचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी संजय मोरे पाटील यांनी निवेदनात केली आहे.

# शेतकऱ्यांच्या न्यायासाठी काँग्रेसचा हल्लाबोल

## जालना जिल्हा काँग्रेसचे धरणे आंदोलन जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सरकारने तात्काळ मदत जाहीर करावी



जालना /प्रतिनिधी :-
जालना जिल्ह्यातील शेतकरी अतिवृष्टीमुळे प्रचंड संकटात सापडले असून त्यांच्या हक्कासाठी जिल्हा काँग्रेस कमिटीने आज दि.३ऑक्टोबर २०२५ चमन येथील महात्मा गांधी पुतळ्यासमोर धरणे आंदोलन करत सरकारला इशारा दिला. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात भव्य शिष्टमंडळाच्या उपस्थितीत निवेदन सादर करण्यात आले.संपूर्ण जिल्ह्यातील पीक नुकसानीचे सरसगट पंचनामे करून तात्काळ मदत जाहीर करावी.

प्रत्येक शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी.संपूर्ण कर्जमाफीची अंमलबजावणी तातडीने करावी.नुकसानीची माहिती दडपणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.केंद्र सरकारने १००% अनुदानावर मदत पॅकेज द्यावे.अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरींना छऊठक्र किंवा डऊठक्र मधून प्रत्येकी ५ लाखांची विनाअट मदत द्यावी.खासदार डॉ.कल्याण काळे यांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले सरकारने शेतकऱ्यांच्या जखमा समजून घेत तातडीने मदत जाहीर केली नाही तर आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू.शेतकऱ्यांच्या न्यायासाठी काँग्रेस शेवटपर्यंत लढेल.या आंदोलनात जालना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष राजेंद्र राख, किसान काँग्रेस जिल्हाध्यक्ष नारायण वाढेकर, शहर काँग्रेस अध्यक्ष अतिक खान, तालुका अध्यक्ष कृष्णा पडुळ, अल्पसंख्यांक प्रदेश उपाध्यक्ष बदर भाई चाउस, माजी सभापती अब्दुल रऊफ परसूवाले, सेवादल जिल्हाध्यक्ष इब्राहिम शेख, नगरसेवक शकील शेख, जेष्ठ नेते ज्ञानेश्वर भांदरगे, खलील शेख, तालुका अध्यक्ष अजय बनकर, कल्याण तारडे, लक्ष्मण मसलेकर, श्रीरंग कामठे, बाळासाहेब आकांत, अध्यक्ष वसीम शेख, तसेच इकबाल कुरैशी, फकीरा वाघ, विष्णु भालेराव, माजी सभापती सोपान तिरोखे, शिवाजी लोखंडे, समीर शेख, सूरज यंगटवार, बाबासाहेब सोनावने, जावेद कुरैशी, जावेद बेग, युनुस शेख, सुरेश गवली, राजेंद्र गोरे, अशोक उबाले, इरशाद शेख, अब्दुल रफीक, अब्दुल रहीम तांबोली, कलीम खान, मुफ्फसिर कुरेशी आदींसह शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी सरकारच्या निष्क्रियतेवर जोरदार घोषणाबाजी केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी काँग्रेसचा संघर्ष आणखी तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.दरम्यान,गेल्या चार दिवसांपासून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आमरण उपोषण करणारे गजानन उगले यांना खासदार डॉ.कल्याण काळे, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्यासह शिष्टमंडळाने भेट दिली व काँग्रेसतर्फे ठाम पाठिंबा दर्शविला.

# लाडक्या बहिणींनी केवायसी करुन घ्यावी : सचिन मुळूक



बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्व लाडक्या बहिणींनी तातडीने आपल्या बँक खात्यांची केवायसी प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना सुरू केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना राज्यभरात महिलांसाठी मोठा आधार ठरली आहे. या योजनेतून पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये शासनाकडून दिले जातात. या योजनेसाठी खात्याची केवायसी पूर्ण करणे अनिवार्य आहे. महिलांना या योजनेचा लाभ निर्विघ्नपणे मिळावा, योजना अधिक पारदर्शक व्हावी व खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी शासनानेही केवायसीवर भर दिला आहे. अनेक बहिणींचे खाते अद्ययावत नसल्याने त्यांना योजनेचा लाभ मिळण्यात अडथळे येतात. त्यामुळे प्रत्येक लाभार्थीने तातडीने केवायसी करून घ्यावी. केवायसी करताना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास महिलांनी थेट शिवसेना कार्यालयाशी संपर्क साधावा. महिलांना मदत करण्याची जबाबदारी पक्ष कार्यकर्त्यांची असून कोणतीही बहीण योजनापासून वंचित राहणार नाही असे सचिन मुळूक म्हणाले.

## पोस्को प्रकरणी निलंबित गटशिक्षणाधिकारी बेडसकरचा जामीन फेटाळला

बीड (प्रतिनिधी):केज तालुक्याचे निलंबित गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर विरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी केज न्यायालयाने जामीन फेटाळला आहे. दरम्यान बेडसकरच्या व्हायरल क्लिप मुळे अनेक अधिकारी अडचणीत येण्याची शक्यता आहे.

बेडसकर लक्ष्मण बापुराव, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती केज याच्याविरुद्ध दि.१९ सप्टेंबर २०२५ रोजी पोस्को कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून बेडसकर फरार आहे. दरम्यान अटकपूर्व जामिनासाठी केज न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला होता. दरम्यान न्यायालयात सुनावणी होऊन बेडसकरचा जामीन फेटाळण्यात आला.

दरम्यान बेडस्कर याचा मोबाईल मधील अनेक अनेक अनेक ऑडिओ क्लिप व्हायरल झाले असून बेडस्करच्या कारणाम्याचे चर्चा बीड जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात होत आहे.

## समाजमाध्यमांतून अतिवृष्टी यादीच्या चुकीच्या आफवांवर नागरिकांनी विश्वास न ठेवण्याचे आवाहन

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांचे शेतीपिक नुकसानीचे संयुक्त पंचनामे करण्याची कार्यवाही तालुका स्तरावर सुरू असून पंचनामे पूर्ण झाल्यानंतर शासनास निधी मागणी जिल्हा प्रशासनाच्या वतीने तात्काळ करण्यात येईल, याची आवश्यक खबरदारी प्रशासनाकडून घेण्यात येत आहे.दरम्यान समाजमाध्यमांवर बीड जिल्ह्यातील माहे सप्टेंबर, २०२५ मधील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या ३०४ गावांची यादी व्हायरल होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर यादी प्रशासनामार्फत तयार केलेली नाही या यादीबाहेरील गावांमध्ये नुकसान झालेले नाही असा चुकीचा संदेश समाजमाध्यमांतून प्रसारित होत आहे. त्यामुळे याद्वारे सर्वसामान्य नागरिकांना स्पष्ट करण्यात येते की,व्हायरल होत असलेली यादी अधिकृत नसून प्रशासनाने ती जारी केलेली नाही.

पंचनामे अद्याप सुरू असून नुकसानीबाबतची माहिती शासनास योग्य मार्गाने सादर केली जाईल. नागरिकांनी अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. प्रशासनास सहकार्य करावे व केवळ अधिकृत माध्यमांद्वारेच माहितीचा स्वीकार करावा. जिल्हा प्रशासन नागरिकांच्या पाठीशी आहे व शेतकऱ्यांच्या नुकसानीसंदर्भात तातडीने योग्य कार्यवाही करण्यात येत असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्थेला दिपस्तंभ पुरस्कार जाहीर

आष्टी - (राजेंद्र लाड) स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित कडा, ता. आष्टी, जि. बीड च्या सर्व सभासद बंधू - भगिनींना कळविण्यात आनंद वाटतो की, पतसंस्थेने महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीत दिपस्तंभाप्रमाणे कार्य करून पतसंस्था चळवळीला मार्गदर्शक दिशा दाखविली आहे. पतसंस्थेने केलेल्या या दिशादर्शक कार्याबद्दल सहकारी संस्थाची शिखर संस्था असलेली, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन च्या वतीने छत्रपती संभाजी नगर विभागातून देण्यात येणारा दिपस्तंभ पुरस्कार सन २०२४- २५ (गट क्रमांक ३, ५० ते १०० कोटी) हा मानाचा पुरस्कार जाहिर झालेला आहे. सदरील पुरस्कार दिनांक १२ व १३ ऑक्टोबर २०२५ रोजी डेनिसन्स रिसॉर्ट कुमटा, कर्नाटक येथे संपन्न होणाऱ्या आंतरराजीय प्रशिक्षण कार्यक्रमात प्रदान केला जाणार आहे. ही शिक्षक पतसंस्थेसाठी अभिमानाची बाब आहे.

पतसंस्थेच्या आजपर्यंतच्या सर्व संचालक मंडळ व सभासदांच्या कार्यतत्परतेमुळे या संस्थेने ५१ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करत सुवर्णमहोत्सवी वर्षात भव्य वटवृक्षाप्रमाणे प्रगती साधली आहे. फक्त कर्जसुविधाच नव्हे तर विमा संरक्षण, बचत प्रोत्साहन, संगणकीकृत पारदर्शक कामकाज, मोबाईल प, चेकलेस बँकिंग, क्यूआर कोड सुविधा अशा आधुनिक सेवा संस्थेने सभासदांना उपलब्ध करून दिल्या आहेत. आज संस्थेची सभासद संख्या ९९० असून भागभांडवल रु. २८ कोटींपेक्षा जास्त आहे, तर ठेवींचा आकडा रु. ५८ कोटींपर्यंत पोहोचला आहे. सभासद कल्याण निधीतून मयत सभासदांच्या वारसांना तीस लाख रुपयांची मदत करण्यात आलेली आहे. संस्था शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांतही अग्रणी असून मिशन जरेवाडी गुणवत्ता विकास अभियान, स्वच्छ शाळा - सुंदर शाळा, गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सन्मान, आदर्श शिक्षक पुरस्कार अशा उपक्रमांद्वारे शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहे.



पतसंस्थेला दिपस्तंभ पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आजवर या पतसंस्थेला या गौरवापर्यंत पोहोचविण्यासाठी आपल्या पतसंस्थारुपी इमारतीचे पायाचे दगड असलेले माजी अध्यक्ष व माजी संचालक मंडळ, आजवरचे सर्व सक्रीय सभासद बांधव, पतसंस्थेचा प्रशासकीय गाडा चालविणारे माजी कर्मचारी, वेळोवेळी सहकार्य केलेल्या सर्व शिक्षक संघटना, प्रशासकीय अधिकारी, बँकिंग अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी तसेच स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे विद्यमान अध्यक्ष मारुती पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेशकुमार शिंदे, संचालक आप्पासाहेब काळे, चंद्रशेखर खाडे, प्रविण मेहेरकर, आजिनाथ गर्जे, पोपट बोराडे, नितीन करडुळे, रत्नाकर चव्हाण, स्वानंद थोरवे, हिरामण पोकळे, विठ्ठल शिंदे, संजय काळे, गोरक्ष गोरे, श्रीम. शैला सातपुते - पोकळे, श्रीम. मनिषा होळकर - उढाणे, कार्यतत्पर व्यवस्थापक ज्योतीराम देसाई, संगणक तज्ञ वैजनाथ रायते, सेवक ज्ञानदेव जाधव यांचे अभिनंदन होत आहे.

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते १९१ गट क व ड पदाच्या उमेदवारांना नियुक्तीपत्र वितरीत करण्यात येणार



बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने लिपिक टंकलेखक पदावरील नियुक्तीसाठी शिफारस केलेले उमेदवार तसेच नविन अनुकंपा धोरणानुसार गट क व गट ड मध्ये नियुक्त होणाऱ्या सर्व उमेदवारांना नियुक्तीपत्रे वितरणाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम दि.०४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नियोजन सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आयोजीत करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान तसेच जिलहयातील सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून लिपीक टंकलेखक पदासाठी शिफारस करण्यात आलेले एकूण ७७ उमेदवार तसेच नविन अनुकंपा धोरणानुसार गट क संवर्गातील एकूण ५१ उमेदवार तर गट ड संवर्गातील एकूण ६३ उमेदवारांना नियुक्तीपत्रे वितरीत करण्यात येणार असून या कार्यक्रमासाठी संबंधीत सर्व नियुक्ती प्राधिकारी आणि नियुक्त झालेले सर्व उमेदवार यांना उपस्थित राहणे आवश्यक आहे.तरी या कार्यक्रमासाठी सर्व कार्यालय प्रमुख तसेच सर्व संबंधीत उमेदवार यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आंतरराष्ट्रीय लेख बुकिंग व दिवाळी फराळ पार्सल सेवा उपलब्ध

बीड /प्रतिनिधी

भारतीय डाक विभाग, बीड विभागामार्फत नागरिकांसाठी खालील सुविधा उपलब्ध करून देण्यात आले आहे. दिवाळी फराळ बुकिंग व पार्सल पॅकेजिंग सुविधा दिवाळी उत्सवानिमित्त नागरिकांना आपल्या परदेशात वास्तव्यास असलेल्या मित्र,नातेवाईकांना फराळ व इतर भेटवस्तू सुरक्षितरित्या पाठविण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध.पोस्ट ऑफिसमध्ये पार्सल पॅकेजिंगची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून वाजवी दरात सुरक्षित पॅकेजिंग व जलद वितरणाची खात्री दिली जात आहे.आंतरराष्ट्रीय लेख बुकिंग सुविधा परदेशात नोंदणीकृत पत्र, स्पीड पोस्ट (एचड) तसेच पार्सल पाठविण्याची सोय.नागरिकांनी आंतरराष्ट्रीय लेख बुकिंग करताना आधार / वैध ओळखपत्र व पूर्ण पत्ता नमूद करणे आवश्यक आहे.गंतव्य देशाच्या अटी व शर्तींचे पालन बंधनकारक आहे.नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा व आपल्या मित्र,नातेवाईकांना दिवाळीच्या शुभेच्छा पत्रासह फराळ पोहोचवावा, असे आवाहन भारतीय डाक विभाग बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा ९ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

बीड (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे या कार्यालयामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ परीक्षेचे आयोजन रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्याचे नियोजित आहे. सदर परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कालावधी दि. १५ सप्टेंबर २०२५ ते दि. ०३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत होता. परंतु महाराष्ट्रात काही जिल्हयामध्ये अतिवृष्टी व पुरस्थिती निर्माण झाल्याने परीक्षार्थी/उमेदवारांना ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यास अडचणींना सामोरे जावे लागल्याने परीक्षार्थी/ उमेदवारांना ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी दि. ०४ ऑक्टोबर २०२५ ते दि. ०९ ऑक्टोबर २०२५ रात्री ११:५९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तसेच विद्यार्थी/ उमेदवारांना तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा शुल्क भरता न आल्यामुळे संबंधित परीक्षार्थी उमेदवारांना नेट बँकिंग/डेबिट कार्ड/क्रेडिट कार्ड द्वारे दि. ०९ ऑक्टोबर २०२५ रात्री ११:५९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नाही. संबंधित परीक्षार्थी/उमेदवारांनी याची नोंद घ्यावी असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे-०४ च्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# करुणा-मैत्रीच्या मार्गानेच मानवतेचा उद्धार धम्मपरिषदेत डॉ.खेमधम्मो महाथेरोंचे प्रतिपादन

### शिवणी येथे महाविहार धम्मभूमीत लोटला जनसमुदाय

बीड/प्रतिनिधी

जगाला प्रज्ञा, शील, करुणा-मैत्रीची शिकवण देणारा, मानवतेचा खरा दीपस्तंभ म्हणजे सम्यक संबुद्ध गौतम बुद्ध होय. त्यांनी दिलेला धम्म म्हणजे केवळ एका धम्मपथाचा उपदेश नसून, मानवी जीवनाला दिशा देणारा शाश्वत मार्ग आहे. असे विचार उदघाटक भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो यांनी व्यक्त केले.


बीड तालुक्यातील महाविहार धम्मभूमी डॉ. भदंत आनंद कौसल्यायन नगर, शिवणी ता. जि. बीड येथे गुरुवार दि. २ ऑक्टोबर रोजी ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या अनुषंगाने अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्मपरिषद पार पडली. सदरील धम्मपरिषद प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेकडून आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी उदघाटक भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो बोलत होते.

या धम्मपरिषदेला संस्थेचे सचिव तथा धम्मपरिषदेचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशील थेरो, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भदंत डॉ. इंदवंस्स महाथेरो, प्रमुख मार्गदर्शक भिक्खु उपगुप्त महाथेरो, प्रमुख अतिथी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, एसपी नवनीत कॉवत, समाज कल्याण आयुक्त प्रदिप भोगले, समाज कल्याण आयुक्त रविंद्र शिंदे, समाज कल्याण सहसंचालक डी. बी. क्षीरसागर, उपायुक्त उमेश सोनवणे, शास्त्रज्ञ डॉ. सिध्दार्थ जोंधळे, प्रमुख धम्मदेसना भिक्खु पय्यातीस महाथेरो, भिक्खु महाविरो थेरो, भिक्खु नागसेन, भिक्खु धम्मघोष, भिक्खु चंद्रमुनी, भिक्खु धम्मप्रिय, भिक्खु पय्यावर्धन, भन्ते बुद्धबोधी आदींची उपस्थिती होती.

पुढे धम्मदेसना देताना भदंत डॉ. खेमधम्मो महाथेरो म्हणाले की, गौतम बुद्धांच्या शिकवणीमुळे समाजातील अंधश्रद्धा, भेदभाव आणि असमानता यांना जबर धक्का बसला. म्हणूनच विज्ञानावर आधारलेला बौद्ध धम्म आज जागतिक पातळीवर स्वीकारला जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे आपल्याला बौद्ध धम्माची दीक्षा देवून उद्धार केला आहे. त्या धम्म प्रवर्तन दिनाला आज ६९ वर्षे पूर्ण होत आहेत. तसेच भिक्खु धम्मशील थेरो यांच्या संयोजनातून ही धम्मपरिषद होत असून ही बाब गौरवास्पद आहे. त्यामुळे बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार अधिक गतीने होण्यास मदत होत आहे. असे विचार त्यांनी व्यक्त केले.



या धम्मपरिषदेचे प्रस्ताविक डॉ. नामदेव शिनगारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अशोक गायकवाड यांनी तर आभार गुलाबराव भोले यांनी मानले. अखिल भारतीय सहाव्या बौद्ध धम्मपरिषदेला जनसमुदाय लोटला होता. दरम्यान शाहीर प्रा. दीपक जमदाडे यांचा भिम व बुद्ध गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.तसेच संविधान ग्रुपकडून दोनशे संविधान प्रति वाटप करण्यात आल्या होत्या.ही धम्मपरिषद यशस्वीपणे पार पडण्यासाठी प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेकडून अतिशय देखणे नियोजन करण्यात आले होते.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# प्रा. गजेंद्र किडे यांचे निधन

कंधार /प्रतिनिधी

येथील श्री शिवाजी ज्युनिअर कॉलेज मधील प्रा. गजेंद्र धोंडीबा पा. किडे (वय ४१ वर्ष) राहणार ता.जळकोट जि. लातूर यांचे हृदयविकाराने बुधवारी दुपारी साडे चार वाजता निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी दुपारी जळकोट येथे त्याच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगी, एक मुलगा, तीन बहिणी असा मोठा परिवार आहे. मनमिळावू स्वभाव, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांची कामगिरी होती. ते जळकोट नगर पंचायतीचे सदस्य होते. सेवानिवृत्त प्रा. धोंडीबा किडे यांचे पुत्र व जळकोट नगर पंचायतीचे माजी नगराध्यक्ष मन्मथ किडे यांचे ते पुतणे होत.

# शिक्षण विभागाच्या ८ केंद्रप्रमुखांना शिक्षण विस्तार अधिकारीपदी पदोन्नती

## हकीम, शिंदे, कोकणे, सेमे, यांच्यासह ८ जणांचा समावेश

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या सेवाज्येष्ठ असलेल्या ८ केंद् प्रमुखांना शिक्षण विस्तार अधिकारी ( वर्ग-३) पदावर पदोन्नतीने नियुक्तीचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी दिले आहेत. सदर पदोन्नती करतांना बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिशाभूल करून केल्याची तक्रार शिक्षक संघटना आणि शिक्षकांनी केली आहे.

या जिल्हा परिषदेने पदोन्नती देण्यात आलेल्या खालील केंद्रप्रमुखांचा समावेश आहे.

१) सय्यद हमीद कट्टुमिया,( केप्रा शा, धारूर) पंचायत समिती, केज २) शिंदे गंगाधर विश्वनाथ, (के.प्रा.शा. आसरडोह ता.धारूर) पं.स. केज, ३) शेमे विठ्ठल एकनाथ (के.प्रा.शा. रेवकी ता. गेवराई) पं. स. गेवराई ४) कोकणे दत्तात्रय भैरू (के.प्रा.शा. कानापूर धारूर) पंचायत समिती, अंबाजोगाई ५) पल्लेवाड यादव मनोहर (नूतन परळी) जिल्हा परिषद शिक्षण विभाग, बीड, ६) चेनलवड भीमाशंकर परशुराम, ( के.प्रा.शा. मोहा, परळी) पंचायत समिती माजलगाव ७) शेळके अशोक अवधूतराव (के प्रशांत बेलंबा तालुका परळी) पंचायत समिती, परळी ८) कोपले अशोक मारुतीराव (के.प्रा.शा., घाटनांदुर) पंचायत समिती, अंबाजोगाई सदर पदोन्नती देण्यासाठी पदोन्नती समितीची बैठक अध्यक्ष तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) प्रदीप काकडे, सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्रा.) भगवान फुलारी आणि अन्य सदस्यांच्या नियंत्रणाखाली झाली. समितीने सेवा जेष्ठता सूची तयार करून मान्यता देण्यात आली.

### बोगस केंद्रप्रमुखांना दिली पदोन्नती

बीड जिल्हा परिषदेने सेवाज्येष्ठता डावलून ८ केंद्रप्रमुखांना शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून पदोन्नती दिली. मात्र यातील ३ ते ४ केंद्रप्रमुख मागील काळात बेकायदेशीर आणि बोगसरित्या केंद्रप्रमुख झाले होते. सदर पदोन्नतीवर शिक्षक संघटनांनी आक्षेप घेतला आहे. या पदोन्नतीमध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप एका ऑडिओ क्लिपद्वारे करण्यात आला आहे. सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी आणि अन्य एका कर्मचाऱ्यांचा या व्हायरल ऑडिओ क्लिपची सध्या मोठी चर्चा होते.

# बदलत्या हवामानावर सरकार धोरणाहीन-कॉ.कारात

# शेतकऱ्यांना मदत करण्याची सरकारची दानत नाही-कॉ.देशमुख

## कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे स्मृती व्याख्यानमालेत वैचारिक चिंतन

परळी / प्रतिनिधी

जागतिक स्तरावर विकसित भारत म्हणून गवगवा करत असलेल्या देशातील सरकारने बदलत्या हवामानावर आधारित शेती याबाबत विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित कोणतेही धोरण न राबवता शेती आणि शेतकरी यांना संपविण्याचा घाट घातला आहे असा सांगत कॉ.वृंदा कारात यांनी केंद्रातील सरकारच्या कारभारावर तासेरे ओढले तर राज्यात शेती आणि शेतकरी भयाण आणि विदारक परिस्थितीत असताना राज्यातील सरकार हे महामार्ग निर्मिती करून उद्योगपती आणि भांडवली वर्गाला पोसण्याचे काम करत असल्याचा आरोप कॉ.उमेश देशमुख यांनी केला.

झुंजार स्वातंत्र्य सेनानी, महाराष्ट्रातील डाव्या चळवळीचे प्रमुख शिलेदार व बीड जिल्ह्याचे माजी खासदार कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या १७ व्या स्मृतीदिनानिमित्त तालुक्यातील मोहा या गावी शुक्रवार दि ३ रोजी स्मृती व्याख्यानमाला संपन्न झाली. या प्रसंगी माकपच्या राष्ट्रीय नेत्या मा. खा.वृंदा कारात, किसान सभेचे राज्य अध्यक्ष कॉ.उमेश देशमुख आदी प्रमुख मार्गदर्शकासह, संस्थेचे सचिव कॉ.एड.अजय बुरांडे, जेष्ठ संचालक कॉ.सुदामदादा देशमुख, कॉ.प्रा.धुळे सर, कॉ.मुरलीधर नागरगोजे, कॉ.सुदाम शिंदे, कॉ.सखाराम शिंदे, सीताबाई नागरगोजे, राजेंद्र वाटकर आदी विचार मंचावर उपस्थित होते.



पुढे बोलताना कॉ.कारात म्हणाले की, केंद्रातील सरकार खोट्याचा आधार घेत इतिहास बदलण्याचा प्रयत्न करत आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात कसलेही योगदान नसणारे देशभक्तीचे धडे देत आहे. देशात हवामान बदलाने शेती आणि शेतीवर आधारित व्यवसाय संकटात आलेला आहे. सरकारी आकडेवारी नुसार देशातील ६० टक्के जमीन (शेती) ही हवामान बदल्याच्या परिनामाणे प्रभावित झालेली असून हवामान बदलानुसार शेती याबाबत नीती आणि धोरण न राबवता जल, जंगल, आणि जमिनी हे खाण उद्योग, उदयोगपती व कारखानदाराच्या घशात घालून नैसर्गिक संसाधनाची लूट करण्याची मोकळी मुभा दिली आहे. शेती आणि शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन शेतकरी आणि श्रमिक यांनी आता एकत्र येत पुन्हा एकदा समाजवादी भारत निर्मितीसाठी हुकुमशाही, भांडवली सरकार विरोधात लढाई करावी लागणार आहे असे मत व्यक्त केले.तर आपल्या अध्यक्षीय समारोपात कॉ.देशमुख यांनी राज्यातील सरकार वर निशाणा साधत सरकार हे शेती आणि शेतकरी विरोधात असून या सरकारची शेतकऱ्यांना मदत करण्याची दानत नसून केवळ बळजबरीने शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहण करून शक्तीपीठ सारखे महामार्ग सारखे अनावश्यक मार्ग निर्मिती करून उद्योगपती, गुत्तेदर पोसण्याचे काम करत आहे असा आरोप केला. नैसर्गिक संकटाने राज्यातील शेतकऱ्यांची भयाण आणि विदारक अवस्था बनलेली असून शेतकरी आत्महत्या वाढत आहेत. या सर्व परिस्थितीत किसान सभा शेतकरी, शेतमजूर आणि श्रमिक, कामगार याना एकजुट करून राज्यातील सरकारला जाब विचारण्याचा निर्धार केला आहे. शेतकरी, शेतमजूर व श्रमिक एकजुट झाला तर राज्यात होत्याच नव्हतं होईल असा सजग इशारा ही त्यांनी आपल्या भाषणातून सरकारला दिला.




## राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती २ ऑक्टोंबर २०२५गुरुवार रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली भूगोल विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. एम. एम. सय्यद यांचा अध्यक्षतेत साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री संतोष कोटले, श्री गुंडेराव सादगीरे हे उपस्थित होते. या प्रसंगी सांस्कृतीक विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. बी. बावीस्कर यांनी उपस्थितांचे आभार मानले.




## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी शिवमाला फाउंडेशनचा सहभाग,विद्यार्थ्यांना केले शैक्षणिक साहित्य वाटप

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मांजरा नदीकाठच्या लोकांचे अतोनात नुकसान झाले असून सरकारची कुठलीही मदत अजून शेतकऱ्याला मिळालेली नाही.परंतु राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती दिवशी शिवमाला फाउंडेशन पुणे यांच्या वतीने केज तालुक्या तील मौजे राजेगाव, दैठणा,पीट्टीघाट येथील जिल्हा परिषदप्राथमिक शाळेत जाऊन तेथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे किट वाटप करण्यात आले. त्यामध्ये स्कूल बॅग, वह्या,पॅड,कंपास, पाण्याची बॉटल व खाद्यपदार्थाचे वाटप करण्यात आले.यावेळी शिवमाला फाउंडेशन पुणे चे अध्यक्ष प्रवीण शिवाजीराव मोरे, सदस्य रत्नमाला मोरे, ऐश्वर्या मोरे,पूजा हंडीबाग,नितीनजी भिसे,दुआ खान,सुरैया पठाण,अजय कांबळे, यशवंत मोरे,गणेश मोरे हे उपस्थित होते.तसेच राजेगाव दैठणा येथील सरपंच ,उप सरपंच, पत्रकार रविंद्र मेटे तसेच गावातील तरुण मंडळी या कार्यक्रमातसहभागी होते.राजेगाव येथे कार्यक्रमाचे सूत्र संचालन शाळेचे मुख्याध्यापक वरवडे रमेश सर यांनी केले व आभार गावचे ज्येष्ठ नेते युवराज कदम यांनी मानले.

# जिल्ह्यात चिंचवण केंद्राचा नावलौकिक मिळवू - केंद्रप्रमुख सुनिल मुंडे

## चिंचवण केंद्राची मासिक शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

वडवणी (प्रतिनिधी):- वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये वडवणी तालुका हा शैक्षणिक क्षेत्रात अग्रक्रमी राहत असून याच वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्र हे अतिशय दुर्गम व डोंगरदर्यात असतांनाही या ठिकाणी असलेली गुणवत्ता नक्कीच सर्वांना आवाक केल्याशिवाय राहत नाही. या केंद्रातील शाळांच्या विद्यार्थ्यांनी नवोदय प्रवेश परिक्षा, सैनिकी स्कूल प्रवेश परिक्षा, विविध शिष्यवृत्ती परिक्षा, मंथन परिक्षा या सर्वच परीक्षांमध्ये नेत्रदिपक असे यश संपादित केलेले आहे. आगामी काळातही सर्वांच्या सहकार्यातून वडवणी तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये चिंचवण केंद्राचा नावलौकिक मिळवू असा ठाम विश्वास चिंचवण केंद्राचे कार्यतत्पर केंद्रप्रमुख तथा केंद्रिय मुख्याध्यापक सुनिल मुंडे यांनी चिंचवण केंद्राच्या पाचव्या मासिक शिक्षण परिषदेत चिंचवण याठिकाणी शिक्षकांना उदबोधन करतांना व्यक्त केला.

वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्राची या शैक्षणिक वर्षातील पाचवी मासिक शिक्षण परिषद केंद्रातील जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा, चिंचवण याठिकाणी शुक्रवार दि.३ ऑक्टोबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. ही शिक्षण परिषद जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक



शाळा चिंचवण, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खेडेवस्ती व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोठरबन नंबर २ या तीन शाळांनी संयुक्तरीत्या आयोजित केली होती. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंचवण केंद्राचे कार्यतत्पर केंद्रप्रमुख तथा केंद्रिय मुख्याध्यापक सुनिल मुंडे तर मुख्य अतिथी म्हणून चिंचवण शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष कोठुळे, कोठारबन शाळेचे मुख्याध्यापक तिडके सर, पिंपळटक्का शाळेचे मुख्याध्यापक बंडू मुंडे सर, सोन्नाखोटा शाळेचे मुख्याध्यापक आश्रुबा मुंडे सर, कोठारबन शाळेचे ज्येष्ठ शिक्षक ज्ञानेश्वर आळणे सर व प्रथम इन्फोटेक फाउंडेशनचे डीगे सर हे मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच चिंचवण केंद्रातील सर्व घटक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, पालक, विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले व शाळेच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा स्वागत सत्कार करण्यात आला. त्यानंतर या परिषदेसाठी सुलभक म्हणून लाभलेले आश्रुबा मुंडे सर यांनी स्पर्धा परिक्षा, खान कॅडमी याविषयी संतोष सावंत सर व श्रीधर नांदवटे सर यांनी सविस्तर असे मार्गदर्शन उपस्थित शिक्षक बांधवांना केले. त्यानंतर नुकत्याच झालेल्या शिक्षकांच्या प्रशासकीय बदलीमध्ये ज्या शिक्षकांची चिंचवण केंद्रातून इतरत्र बदली झाली आहे अशा सर्व शिक्षकांना सत्कार करुन निरोप देण्यात आला. तर ज्या शिक्षकांची नव्याने चिंचवण केंद्रात नियुक्ती झाली आहे अशा सर्व नूतन शिक्षकांचा सत्कार करुन त्यांचे स्वागत करण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे काही दिवसांपूर्वीच चिंचवण केंद्रस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार केंद्रातील दोन गुणवंत शिक्षकांना जाहीर करण्यात आलेले होते. त्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळा येथिल सहशिक्षक भैरवनाथ शिंदे सर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सवासेवाडी येथिल सहशिक्षक बंडू नागरगोजे सर यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देत केंद्रस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४-२५ प्रदान करण्यात आला. आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवडण्यात आलेले दोन्ही शिक्षक बांधव हे अत्यंत प्रामाणिकपणे आपले शैक्षणिक कार्य बजावत असून त्यांच्या हातून आजवर असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल झालेले आहे. करिता त्यांचा हा आदर्श शिक्षक पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पुढे बोलतांना सुनिल मुंडे सर म्हणाले की, चिंचवण केंद्रातील १९ पैकी तब्बल १५ शाळांची पटसंख्या ही गतवर्षीच्या तुलनेत यंदा वाढली असून याचे सर्वस्वी श्रेय हे त्या शाळेतील गुणवंत शिक्षकांना जाते. यावर्षी या केंद्रातील ५ विद्यार्थी हे नवोदय प्रवेशास पात्र ठरले असून इयत्ता पाचवी व सातवीच्या शिष्यवृत्ती परिक्षेतही असंख्य विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले असून मंथन परिक्षेतही अनेक विद्यार्थी पात्र ठरलेले आहेत. केंद्रातील जवळपास सर्वच शाळांमध्ये ई-लर्निंगची सुविधा दर्जेदारपणे सुरु

## राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेतर्फे विविध मागण्यांसाठी

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण संपन्न

वडवणी (प्रतिनिधी)- राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने दिनांक ०३/१०/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी १० वा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बीड येथे महाराष्ट्र राज्य चे प्रमुख धर्मशिल मिश्राम सर यांच्या नेतृत्वाखाली व माजी प्रकल्प संचालक तथा भाजपा कामगार मोर्चा बीड जिल्हा अध्यक्ष ओमप्रकाश गिरी सर व शेख अफसर बशीरमिया सर क्षेत्रीय अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत एक दिवसीय उपोषण व लक्षवेधी आंदोलन करण्यात आले . राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या पदावर २००४ पासून अत्यंत अल्प मानधनावर कार्यरत होते. सदरील प्रकल्प हा २०२१ पासून समग्रह शिक्षा अभियानात विलिन करण्यात आला आहे. विलीन करताना

यामध्ये महाराष्ट्रातील सोळा जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचा कोणताही



शिक्षक कर्मचारी चा विचार करण्यात आलेला नाही . बीड जिल्ह्यातील ११० कर्मचारी कर्मचाऱ्यांवर तसेच महाराष्ट्रातील २२०० शिक्षक कर्मचारीवर बेरोजगारीची कुऱ्हाड केंद्र शासनाच्या या निर्णयामुळे कोसळली आहे. २००४ पासून महाराष्ट्रातील या प्रकल्पात काम दिलेल्या सेवेचा मोबदला म्हणून

२०१६ पासून राज्य शासन तथा केंद्र शासन यांच्याकडे शासकीय सेवेत समायोजन करण्यासाठी साधी वेळोवेळी पाठपुरावा आम्ही करत आहोत . करिता राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व यावर तत्काळ निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत समयोजन करण्यात यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली . तसेच यामध्ये वयाची पन्नाशी ओलांडली अश्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या एकत्रित सानुग्रह अनुदान देऊन पुनर्वसन करण्यात यावे.यासाठी बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पपातील शिक्षक, लिपीक, शिपाई कर्मचारी उपस्थित होते.यावेळी माजी प्रकल्प संचालक ओमप्रकाश गिरी सर यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना शब्द दिला की भाजपा कामगार मोर्चा बीड च्या वतीने एकदिवसीय लाक्षणिक आंदोलन साठी पाठिंबा देतो .व भाजपा कामगार मोर्चा च्या माध्यमातून शासन स्तरावर शिक्षण विभाग, कामगार विभाग कडे पाठपुरावा करून आपला प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करतो.तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी शेख अफसर सर यांचे पण मोलाचे मार्गदर्शन केले.राज्य सचिव शंकर झाडे हे आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील शिक्षक कर्मचारी यांनी आजपर्यंत संविधानीक पद्धतीने शांततेत च्या मार्गाने आंदोलन, निवेदन देऊन मागणी शासनाकडे केली पण शासनाने आमच्या कडे पुर्ण दुर्लक्ष केले आमचा शासनाने आंत पाहु नाही.लवकर निर्णय न घेतल्यास यापलीकडे जाऊन तिर्व आंदोलन करण्यात येईल असे म्हटले.तसेच राहुल घनगाव जिल्हा अध्यक्ष, मैंद शहाजी सर , विष्णू काळे सर , कांबळे रंजनी मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी सर्व शिक्षक कर्मचारी यांनी घोषणा देऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर परिसर दुमदुमून सोडला होता.एकदिवशीय लाक्षणिक लक्षवेधी आंदोलन करण्यासाठी संजय सांबळे सर, सचिन दिवटे, व्यंकटी काळे सर , प्रकाश काळे सर, अरुण टकले,रमेश सलगर सर, दत्तात्रय टाकणकर सर, योगेश गायकवाड,समीर शेख ,पिसाळ दिनेश,आंवतकर जयराम, घडवे रमेश, शेळके हरिभाऊ, जोगदंड विठ्ठल,दिक्षीत वर्षा,लबडे वर्षा, म्हेत्रे ज्योती, ढोले मंजूषा,आगळावे राधा, खोडके मंजूषा, आचार्य गायत्री, विद्या तुरकमारे,जगतकर सुवर्णा,संगीता कुलकर्णी, काटे मनिषा,सपकाळ इंदू,कुसळे कल्पना, खैरे सुरेखा,इत्यादी शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

## महेश बेद्रे,अँड. श्रीनिवास बेद्रे ची तत्परता पूरग्रस्ता च्या कामाला आली

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई तालुक्यातील अनेक गावे गोदावरी नदीच्या किनाऱ्यालगत असल्यामुळे नुकत्याच आलेल्या पुरामुळे सर्वाधिक बाधित झाले आहे. शेती वाहून गेली, संसार उद्ध्वस्त झाला, शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांच्या डोळ्यात अश्रूंचा पूर दाटून आला. अशा वेदनादायी परिस्थितीत काँग्रेस पक्षाचे नेते महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री विश्वजीत कदम यांच्या भारती विद्यापीठाच्या माध्यमातून काँग्रेसच्या खासदार रजनीताई पाटील यांच्या संवादाने गेवराई तालुक्यातील २० गावात संसार उपयोगी किराणा साहित्याच्या १००० किट चे जिल्हा युवक काँग्रेस व गेवराई तालुका काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून वाटप करण्यात आले. खऱ्या अर्थाने बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष श्रीनिवास बेदरे, गेवराई तालुका काँग्रेसचे अध्यक्ष महेश बेदरे यांच्या कडून पूरग्रस्तांच्या अश्रूंना दिलासा दिला आहे

दिनांक ३ ऑक्टोबर रोजी सकाळी नागझरी, सावळेश्वर, सुरळेगाव, राक्षसभुवन, खामगाव, राजापूर, काठोड, रामपुरी, गंगावाडी सह सिदफना काठावरील हिरापूर गावातील



प्रत्येकी ५० पुरग्रस्ताची भेट घेऊन प्रत्येक्षरित्या किट चे वाटप केले. पूर वसरल्या नंतर खऱ्या अर्थाने पूरग्रस्त घरांना संसारोपयोगी साहित्याची गरज असते परंतु अनेक राजकीय लोक फक्त भेट देऊन फोटो सेशन करतात परंतु या काँग्रेस अपवाद ठरले असून प्रत्यक्षात मदत केल्याने पूरग्रस्तांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. याप्रसंगी भारती विद्यापीठाचे उपप्राचार्य चव्हाण साहेब, पाटील साहेब, काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष श्रीनिवास बेद्रे, काँग्रेसचे गेवराई तालुका अध्यक्ष महेश बेदरे,

## जामखेड नगरपरिषद क्षेत्रातील थकबाकीदारांना

# मालमत्ता करावरील ५०% शास्ती माफीची अभय योजना' जाहीर - मुख्याधिकारी अजय साळवे

जामखेड /प्रतिनिधी

जामखेड नगरपरिषद क्षेत्रातील थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करण्यासाठी 'अभय योजना' लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, थकबाकीदारांना एकूण शास्ती रकमेच्या ५० टक्के पर्यंत शास्ती माफ करण्यात येत आहे.

याबाबत जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी मुख्याधिकारी, जामखेड नगरपरिषद यांच्या प्रस्तावानुसार एकूण शास्तीच्या ५० टक्के म्हणजेच रु. ३,७४,३९,७८७/- (तीन कोटी चौहत्तर लाख एकोणचाळीस हजार सातशे सत्याऐंशी रुपये) इतक्या रकमेच्या शास्ती माफीस मंजुरी दिली असल्याची माहिती जामखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाद्वारे १९ मे २०२५ रोजी नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करून वसूल करण्यासाठी प्रोत्साहनात्मक अभय योजना राबवण्याबाबत निर्णय जाहीर करण्यात आला होता. राज्यातील नगरपरिषद क्षेत्रामध्ये अनेक वेळा मालमत्ता कराची थकबाकीची रक्कम जास्त असणे, मालमत्ता धारकांची आर्थिक अडचण असणे व इतर कारणांमुळे मालमत्ता कराचा भरणा करण्यात येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १५० (अ) १ नुसार बिलाच्या न भरलेल्या रकमेवर नगरपरिषदेकडून दरमहा २% शास्ती लावण्याचे प्रावधान आहे. त्यामुळे मालमत्ता धारकाच्या एकूण थकबाकीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होऊन त्याचा विपरीत परिणाम कर वसुलीवर होतो. यावर उपाययोजना म्हणून या योजनेच्या अटी व शर्ती :

१. या अभय योजनेचा लाभ फक्त त्याच मालमत्ता धारकांना मिळेल, जे दि. ३१/०३/२०२५ पर्यंतच्या त्यांच्या मूळ मालमत्ता कराचा भरणा दि. ३१/०३/२०२६ पर्यंत करतील.

२. दि. ३१/०३/२०२५ पर्यंत थकीत असलेल्या मालमत्ता करावरील ५०% शास्ती माफी या योजनेअंतर्गत मिळेल.३. दि. ३१/०३/२०२६ नंतर शास्ती माफीसाठी येणाऱ्या कोणत्याही प्रकरणाचा विचार केला जाणार नाही.तरी जामखेड नगरपरिषद क्षेत्रातील थकबाकीदार मालमत्ता धारकांनी या संधीचा अधिकाधिक लाभ घेऊन आपला थकीत मालमत्ता कर आणि ५०% भरलेली शास्ती तत्काळ नगर परिषद कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज भरून या अभय योजनेत सहभागी व्हावे, नगरपरिषद क्षेत्रातील थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करून कर वसुल करण्यासाठी प्रोत्साहन मिळवण्याच्या दृष्टीने अभय योजना शासनाने लागू केली आहे. त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन जामखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे यांनी यावेळी केले आहे.

## एस बी आय ग्राम सक्षम प्रकल्पाच्या माध्यमातून गांधी जयंती कार्यक्रमातून स्वच्छतेचा संदेश



दिलासा संस्था यवतमाळ आणि एस बी आय फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आज २ ऑक्टोबर गांधी जयंती चे औचित्य साधून एस बी आय ग्राम सक्षम प्रकल्पाच्या माध्यमातून हिंगणी बु. येथे गांधीजी चे आदर्श आणि शिकवण यांची माहिती ग्रामीण भागात सर्व सामान्य पर्यंत पोहचणे आणि ग्राम विकास करणे हे उद्देश घेऊन संस्था ही धारूर तालुक्यात गेली दशकात विविध उपक्रम राबवून ग्रामीण भागात नाळ जुळवून आहे. आज गांधी जीच्या जयंती निमित्त साधून हिंगणी बु.येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आणि नंतर परिसरातील शेतकरी वर्गाला शासनाच्या विविध योजनांशी जोडण्यासाठी कृषि विभागाचे, आत्मा विभाग आणि पोखरा चे कर्मचारी त्या मध्ये उप कृषी अधिकारी बोराडे साहेब, सहाय्यक कृषी अधिकारी केंद्रे साहेब, आत्मा विभागाचे देशमुख साहेब, धस साहेब, या अधिकारी अधिकारी यांनी देखील आजच्या कार्यक्रमात हजेरी लावली आणि सर्वांसोबत मिळून गावातील परिसर स्वच्छतेने सुरुवात करण्यात आली आणि नंतर कार्यक्रमाला सुरुवात केली या मध्ये दिलासा संस्था आणि एस बी आय ग्राम सक्षम प्रकल्प विषयी प्रकल्प मॅनेजर रोहित चव्हाण यांनी मांडणी केली तसेच प्रकल्पाचे उद्देश सर्व शेतकऱ्यांना सांगितले या कार्यक्रमाचे व्यवस्थापन आणि आयोजन एकनाथ शिंदे यांनी केले तसेच गावचे प्रथम नागरिक हिंगणी बु. चे सरपंच योगेश सोळंके आणि गावकरी यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला आणि कार्यक्रम यशस्वी केला.

## बी. फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी




अंबाजोगाई (प्रतिनिधी):- श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती दिनांक २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने अत्यंत उत्साहात व राष्ट्रभक्तिपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सुरुवातीला महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. मंदार चौधरी यांनी उपस्थितांचे मनःपूर्वक स्वागत केले.यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात दोन्ही महान नेत्यांच्या कार्याचा सखोल आढावा घेतला. त्यांनी गांधीजींच्या 'अहिंसा परमो धर्मः' या तत्त्वज्ञानाचे आणि शास्त्रीजींच्या 'जय जवान, जय किसान' या घोषवाक्याचे समकालीन संदर्भासह महत्त्व विशद केले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वच्छता शपथ, समूहगीत, तसेच प्रेरणादायी भाषणे सादर केली. या उपक्रमांतून गांधीजी व शास्त्रीजींच्या विचारांचा विद्यार्थ्यांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला गेला. कार्यक्रमाचे संचालन व आयोजन अत्यंत सुबक आणि शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या समारोपात प्रा. चौधरी यांनी सर्व मान्यवर, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, अहिंसेचे महत्त्व आणि आत्मशिस्तीची जाणीव निर्माण करणारा ठरला.

## पाटोदा तालुक्यातील नागरिकांना दिलासा – आमदार सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नांना यश

### २ कोटी ९८ लाख ८१ हजार रुपयांचा पूल मंजूर



पाटोदा (प्रतिनिधी) :

पाटोदा तालुक्यातील ग्रामीण भागासाठी मोठी दिलासादायक बातमी आहे. आमदार सुरेश आण्णा धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून राज्यमार्ग क्रमांक ५६१ ते रोहतवाडी - घाटेवाडी - आरसुळवस्ती - बेनसूर या रस्त्यावर नव्या पुलाच्या बांधकामास शासनाने मंजुरी दिली आहे. या बांधकामासाठी तब्बल २ कोटी ९८ लाख ८१ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

वाहतुकीसाठी मोठा दिलासा

या भागातील नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांना पावसाळ्यात या मार्गावरून जाणे कठीण होत होते. पाणी साचल्याने दळणवळणात मोठे अडथळे निर्माण व्हायचे. शेतमाल बाजारात नेणे, मुलांच्या शाळा-कॉलेजच्या प्रवासात अडचणी निर्माण होत असल्याने नागरिकांचे जीवनमान त्रासदायक बनले होते. आता पुलाच्या बांधकामामुळे ही समस्या कायमची दूर होणार आहे.

नागरिकांचा आनंद, आभार व्यक्त

पूल मंजुरीची बातमी समजताच परिसरातील नागरिक आणि शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला.आम्हाला या पुलाची अनेक वर्षांपासून गरज होती. आता शेतीमाल बाजारात नेता येईल, मुलांना शाळेत जाता येईल, दैनंदिन वाहतूक सुलभ होईल. हे आमदार धस यांच्या पाठपुराव्यामुळे शक्य झाले आहे, असे शेतकरी भिमराव गवळी यांनी सांगितले.

स्थानिक महिलांनीही समाधान व्यक्त करत म्हटले, पावसाळ्यात पाण्यातून रस्ता ओलांडावा लागायचा. आता पूल झाल्यावर जीवाची भीती न राहता सुरक्षितपणे प्रवास करू शकतो.

आमदार सुरेश धस यांचे प्रतिपादन

या निर्णयाबाबत आमदार सुरेश धस म्हणाले,

पाटोदा तालुक्याचा सर्वांगीण विकास ही माझी जबाबदारी आहे. शेती, दळणवळण, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रात काम करण्याचा माझा प्रयत्न सुरू आहे. पुलाच्या बांधकामामुळे हजारो नागरिकांना दिलासा मिळणार आहे. हा पूल ग्रामीण विकासयात्रेतील महत्त्वाचे पाऊल ठरेल.

विकासाच्या दिशेने एक पाऊल

या पुलामुळे रोहतवाडी, घाटेवाडी, आरसुळवस्ती, बेनसूर व परिसरातील गावांना थेट जोड मिळणार आहे. दळणवळण सोपे होऊन शेतमाल बाजारपेठेत वेळेवर पोहोचेल. आर्थिक विकासालाही गती मिळेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

## शहागड नदीकाठच्या गावांत महसूल

# प्रशासनाची पाहणी

### पूरबाधितांना दिलासा ;दोन दिवसांत मदत मिळणार



शहागड /प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे गोदावरी नदीच्या पाणीपातळीत झालेल्या वाढीचा फटका शहागड परिसरातील नदीलगतच्या गावांना बसला आहे.अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले. या पार्श्वभूमीवर अंबडचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी,तहसीलदार विजय चव्हाण,मंडळ अधिकारी संदीप नरुटे यांनी आज गोरी, गंधारी, डोमलगाव, साष्टपिंपळगाव, सव्वाशे वस्ती व वाळकेश्वर शहागड या गावांची पाहणी केली.पाहणी दरम्यान महसूल अधिकाऱ्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. गोदावरी नदीचे पाणी घरात शिरल्यामुळे झालेले नुकसान प्रत्यक्ष पाहून पंचनामे तातडीने करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांनी दिले. पूरबाधितांना दिलासा देताना उपविभागीय अधिकारी पारधी यांनी सांगितले की

दोन दिवसांत पंचनामे पूर्ण करून शासन नियमांनुसार आर्थिक मदत वितरित करण्यात येईल. पूरग्रस्त कुटुंबांना शासनाकडून कोणतीही मदत रोखली जाणार नाही.

## दसऱ्यानिमित्त स्नेह मिलन उत्साहात संपन्न




मंठा /प्रतिनिधी

मंठा येथे विजयादशमी व दसऱ्यानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात ग्रामदैवत श्री रेणुका मातेच्या प्रतिमेचे पूजन करून झाली.

यानंतर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांचा सत्कार नगराध्यक्ष व बाजार समिती संचालक वैजनाथ बोराडे, नगरसेवक सचिन बोराडे व सभापती दिपक बोराडे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी लोणीकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, दसऱ्याचा सण हा सत्याच्या विजयाचा आणि ऐक्याचा प्रतीक आहे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन विकासासाठी काम केले पाहिजे. तसेच त्यांनी सर्वांना दसऱ्याच्या शुभेच्छाही दिल्या.या स्नेह मिलन कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक, व्यापारी, डॉक्टर, पत्रकार, पक्ष पदाधिकारी, मित्रमंडळी तसेच विविध संघटनांचे मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते व त्यांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमामुळे परस्परांतील आपुलकी, स्नेह व ऐक्याची भावना वृद्धिंगत झाल्याचे समाधान उपस्थितांनी व्यक्त केले.



**तुलसी महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन**

**बीड (प्रतिनिधी): अहिंसेचे पुजारी राष्ट्रपिता महात्मा गांधी व साधेपणाचे मूर्तिमंत प्रतीक भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त तुलसी संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.**

**या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डी.जी. निकाळजे, प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, प्राचार्य प्रा. डी.डी. राऊत यांच्यासह प्राध्यापकवर्ग, प्रशासकीय कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी गांधीजींच्या सत्य-अहिंसा विचारांचे आणि शास्त्रीजींच्या साधेपण व कर्तृत्वाचे स्मरण करून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन दिले.**

## लोकनेत्या स्वर्गीय केशरकाकू यांना आज अभिवादन

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या माजी खा.स्व. केशरकाकू क्षीरसागर यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त आज दि.०४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वा. अभिवादन कार्यक्रम होणार असून सकाळी १०.३० वा. ह.भ.प. रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांचे किर्तन होणार आहे. यानिमित्त सकाळी १०.०० वा. अभिवादन कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने आष्टी आणि पाटोदा तालुक्यातील ४ पूलांच्या बांधकामास मंजुरी



अनेक दिवसांची प्रतीक्षा संपली, नागरिकात आनंद व्यक्त

आष्टी (प्रतिनिधी) आष्टी विधानसभा मतदारसंघातील आष्टी आणि पाटोदा तालुक्यातील अनेक दिवसापासून प्रतीक्षेत असलेल्या ४ ठिकाणी १५ कोटी ४२ लक्ष ३३ हजार रु. किमतीच्या पुलांच्या बांधकामास मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मंजुरी मिळाली आहे. गेल्या अनेक दिवसापासून या ठिकाणी पूल बांधकाम करण्याची आवश्यकता असल्यामुळे या गावांच्या परिसरातील नागरिकांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाने दि. ३० ०९/२०२५ रोजी शासन निर्णया द्वारे या कामास मंजुरी देण्यात आली आहे. आष्टी तालुक्यातील - १) राज्यमार्ग क्र. ५४ शिराळ ते हनुमंतगाव इजिमा क्र. १०७ ते टाकळसिंग या रस्त्यावर पूलाचे बांधकाम किंमत ६ कोटी ३६ लक्ष १८ हजार रु. २) आष्टी ते भातोडी या रस्त्यावर पूलाचे बांधकाम किंमत २ कोटी ६० लक्ष १२ हजार रू. ३) राज्यमार्ग क्र. ६५१ ते वाघळूज या रस्त्यावर पूलाचे बांधकाम किंमत ३ कोटी ४६ लक्ष ८२ हजार रू. आणि पाटोदा तालुक्यातील १) राज्यमार्ग क्र. ५६१ ते रोहतवाडी - घाटेवाडी - अडसूळवस्ती बेनसूर या रस्त्यावर पूलाचे बांधकाम किंमत २ कोटी ९८ लक्ष ८१ हजार रु. असे एकूण १५ कोटी ४२ लक्ष ३३ हजार रु. किमतीच्या ४ पूलांच्या बांधकामास मंजुरी मिळाली आहे. अशी माहिती बांधकाम विभागाचे स्वीय सहाय्यक विनोद रोडे यांनी दिली आहे.या चारही ठिकाणी नागरिकांना रहदारी आणि वाहतुकीसाठी अडचणी निर्माण होत असत या चारही पूलांच्या बांधकामास मंजुरी मिळाल्यामुळे सर्व संबंधित गावातील नागरिक, शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त करून कार्यतत्पर आमदार सुरेश धस यांचे आभार मानले आहेत.



## आनंद शैक्षणिक संकुलात दसरा उत्सव साजरा

आष्टी - (प्रतिनिधी) विजयादशमी या पावन पर्वानिमित्त आनंद शैक्षणिक संकुल, आष्टी येथे मुलींच्या वसतिगृहासमोर लक्ष्मीपूजन व रावण दहन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव डॉ. अजय दादा धोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, प्रा. सागर वाघुले, प्रा. संदीप नन्नवरे, प्राचार्य डॉ. श्रीराम आरसुळ, प्राचार्य डॉ. चंद्रकांत गोसावी, प्राचार्य डॉ. सुनिल कोल्हे, प्राचार्य संजय बोडखे तसेच वसतिगृहाच्या रेक्टर श्रीमती अस्वर मॅडम व श्रीमती महाले मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. अजय दादा धोंडे यांच्या हस्ते विधिपूर्वक लक्ष्मीपूजनाने झाली. त्यानंतर पारंपरिक पद्धतीने रावण दहन करण्यात आले. या दहन सोहळ्यातून सत्याचा असत्यावर विजय, धर्माचा अधर्मावर विजय, चांगल्याचा वाईटावर विजय अधोरेखित करण्यात आला.

यावेळी वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपूर्ण वातावरण आनंदमय झाले. दसरा हा सत्य, नीती व पराक्रमाचा प्रतीक आहे. या निमित्ताने विद्यार्थिनींना सकारात्मक विचारसरणी स्वीकारण्याचा आणि आयुष्यातील अडचणींवर धैर्याने मात करण्याचा संदेश देण्यात आला.

# रक्तदान करा, जीवनदान द्या - प्राचार्य डॉ. शेख मो. बाबर

परभणी (प्रतिनिधी): अपघात किंवा शस्त्रक्रियेच्या वेळी रुग्णाला रक्ताची मोठ्या प्रमाणावर गरज असते. रक्ताचा प्रत्येक थेंब अमूल्य असतो. त्यामुळे रक्तदान म्हणजे रुग्णाला जीवनदान देण्यासारखे आहे. प्रत्येकाने स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रती आपले कर्तव्य बजावले पाहिजे, असे प्रतिपादन ज्ञानोपासक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख मो. बाबर यांनी केले.



परभणी येथील ज्ञानोपासक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील रक्तकेंद्र, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत २०४७ या उपक्रमांतर्गत स्वैच्छिक रक्तदान शिबिर नुकतेच पार पडले.

या शिबिरात ३३ विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. विशेष म्हणजे मुलींचा सहभाग उल्लेखनीय राहिला. शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. शेख मो. बाबर यांच्या हस्ते करण्यात आले. रक्त संक्रमण अधिकारी डॉ. सुभाष सिसोदिया यांनी मार्गदर्शन करताना रक्तदानाविषयी असलेले गैरसमज दूर केले. त्यांनी सांगितले की, रक्तदान केल्याने हृदयविकार होत नाहीत, शरीरात कमजोरी येत नाही, तसेच रक्त संक्रमण सुरक्षित असते.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी समाजसेवा अधिकारी आत्माराम जटाळे, टेक्निशियन प्रतीक भराडे, शेख रिजवान, हमीद सिद्दिकी आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गणेश मारेवाड, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. जी.एस. पिसे यांनी केले. यशस्वी आयोजनासाठी प्रा. संदीप पाटील, प्रा. डॉ. गणेश लोंढे, प्रा. वैजनाथ काळदाते, प्रा. नितीन शिंदे, प्रा. सूर्यकांत चोरघडे, प्रा. डॉ. दिलीप भराडे, प्रा. डॉ. आनंद लोखंडे, प्रा. डॉ. संतोष सोळंके, प्रा. भाऊराव वाकळे, प्रा. आनंद राऊत यांनी परिश्रम घेतले.

# नांदेड-पुर्णा रोडवर दुचाकींचा भीषण अपघात; एकाचा जागीच मृत्यू-१ गंभीर जखमी

पिंपळा (भत्या) येथिल घटना पुर्णा ता.३ (प्रतिनिधी) - नांदेड-पुर्णा रोडवर दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला असून दुसरा तरुण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना तालुक्यातील मौजे पिंपळा भत्या येथे शुक्रवारी (दि.३ ऑक्टोबर) सकाळी सुमारास १० वाजता घडली.घटनेत मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव संजय शेषराव आसोरे (वय ३४, रा. शक्तीनगर, ईतवारा नांदेड) असे आहे. तर गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव शिवप्रसाद अशोकराव पाटील (रा. दत्तनगर, भावसार चौक, नांदेड) असे आहे.

हाती आलेल्या प्राथमिक माहिती नुसार, मृत संजय आसोरे हे आपल्या दुचाकीवर (एम.एच.२६/बी.एच./५३७१) नांदेडहून पूर्णेकडे येत होते. तर त्याचवेळी दुसऱ्या दुचाकीवर (एम.एच./बी.व्ही./८५४२) शिवप्रसाद पाटील पूर्णेहून नांदेडच्या दिशेने जात असताना पिंपळा भत्या गावाजवळ समोरासमोर धडक झाली.धडक होताच अपघातस्थळी मोठा आवाज झाल्याने स्थानिक ग्रामस्थांनी धाव घेतली. सामाजिक कार्यकर्ते व्यंकटराव मोरे यांनी तातडीने चुडावा पोलीसांना माहिती दिली. सपोनि सुशांत किणगे, फौजदार अरुण मुखेडकर, जमादार प्रभाकर कच्छवे,



पोहेका मिटके, कैलास ढेंबरे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

गंभीर जखमी शिवप्रसाद पाटील यांना व्यंकटराव मोरे व पोहेका मिटके यांच्या मदतीने रुग्णवाहिकेतून नांदेड येथे उपचारासाठी हलवण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.दरम्यान, पोलीसांनी मृत संजय आसोरे यांचा मृतदेह ताब्यात घेऊन पंचनामा करून उत्तरीय तपासणीसाठी ग्रामीण आरोग्य केंद्र कावलगांव येथे पाठवला आहे. या घटनेची नोंद चुडावा पोलीस ठाण्यात करण्यात आली असून तपास सपोनि किणगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा महामोर्चा

परभणी (प्रतिनिधी): परभणी जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टी, पूर व नद्यांच्या प्रलयंकारी पाण्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. खरीप हंगाम उद्ध्वस्त झाला असून अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी एकजुटीने महामोर्चा काढत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली.

हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाच्या विरोधात नाही, तसेच कुणाच्या समर्थनार्थही नाही. हा शेतकऱ्यांचा, शेतकऱ्यांच्या मुलांचा आणि हक्कांसाठी लढणारा महामोर्चा आहे, असे शेतकरी नेत्यांनी स्पष्ट केले.



यावेळी शेतकऱ्यांनी हेक्टरी ५०,००० अनुदान मदत महाराष्ट्र शासनानेही इतर राज्यांप्रमाणे शेतकऱ्यांना द्यावी. मदत ३ हेक्टर मर्यादेतच देण्यात यावी. पिककपाणी प्रयोग मध्ये सर्व शेतकऱ्यांचा समावेश करून १०० टक्के पिकविमा लागू करण्यात यावा. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय - विदर्भातील आंबा बहराच्या नुकसानीप्रमाणेच परभणी जिल्ह्यातील संत्रा उत्पादकांना बागायती व वार्षिक पिकांसाठी नुकसानभरपाई मंजूर करण्यात यावी. सरसकट कर्जमाफी - कोणत्याही अटी-शर्ती न ठेवता शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी. शेतकऱ्यांना मदत ॲग्रीशी खऊ द्वारे नव्हे तर ७/१२ उताऱ्यांच्या आधारे देण्यात यावी. दरवर्षी पूर व नदीकाठावरील शेतजमिनी वाहून जाण्याने होणाऱ्या नुकसानीसाठी विशेष आर्थिक मदत देण्यात यावी. आदी मागण्याचे निवेदन प्रशासनास दिले.

मोर्चात सहभागी शेतकऱ्यांनी इशारा दिला की, जर शासनाने लवकरात लवकर मागण्या मान्य केल्या नाहीत, तर आम्ही यापेक्षाही तीव्र व उग्र आंदोलन छेडू. परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू राहील. आवश्यक असल्यास जिल्ह्यातील राजकीय नेत्यांना तसेच शासकीय अधिकाऱ्यांना प्रवेशबंदी केली जाईल. शेतकऱ्यांचा हा महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर दाखल होत असताना घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.

# शारदा महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

परभणी : येथील शारदा महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती प्राणीशास्त्र विभागाकडून उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून उपप्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे, गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष नाकाडे, डॉ. भगवान पाटील व सुरेश जयपूरकर यांची विचार मंचावर उपस्थिती होती. प्रथमत: महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी देशाला नव्हे तर जगाला शांततेचा व अहिंसेचा संदेश दिला. तर लालबहादूर शास्त्री हे स्वातंत्र्य चळवळीतील एक थोर सेनानी, कार्यकर्ते, राष्ट्रभक्त आणि भारताचे दुसरे पंतप्रधान होते, जय जवान जय किसान हा नारा त्यांनी दिला. लालबहादूर शास्त्री म्हणजे मूर्ती लहान आणि कृती महान असे त्यांचे एक आदर्श व्यक्तिमत्व होते.

या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना डॉ. भगवान पाटील म्हणाले महात्मा गांधी यांनी जीवनाचा संपूर्ण त्याग करून राष्ट्रासाठी सेवा अर्पण केले म्हणून देशाला स्वातंत्र्य मिळाले तर डॉ. संतोष नाकाडे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री दोन्ही महापुरुषांच्या कार्य समाजासाठी उपयुक्त आहे हे सांगितले. सूत्रसंचालन डॉ. अविनाश पांचाळ तर आभार सुरेश जयपुरकर यांनी केले, या कार्यक्रमाला उपस्थित डॉ. ज्ञानोबा मुंढे, डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, डॉ प्रशांत मेने, डॉ. रमेश भालेराव, डॉ. हनुमंत शेवाळे यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. ह्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.आर.पी.देशपांडे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.अविनाश पांचाळ यांनी मांडले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजाराम मूत्रटकर व तनुजा रासवे यांनी प्रयत्न केले.

# परभणीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा रूमन मोर्चा



परभणी (प्रतिनिधी): गेल्या तीन महिन्यांपासून परभणी जिल्ह्यात तसेच संपूर्ण मराठवाड्यात अतिवृष्टी, ढगफुटी व पूरपरिस्थितीमुळे खरीप हंगामाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. मुग, उडीद, सोयाबीन, कापूस यांसारखी पिके तसेच बागायती पिके आणि बहुवार्षिक फळबागा पूर्णपणे बाधित झाल्या आहेत. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर रूमन मोर्चा काढण्यात आला.

मोर्चाचे नेतृत्व संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे यांनी केले. या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांच्या भावना व्यक्त करताना ढगे म्हणाले की, शेतकरी संकटात असताना सरकारकडून ठोस निर्णय होत नाहीत. मंत्र्यांची भेट-दाखल ही केवळ दिखाव्यापुरती आहे. संतप्त शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखी विधाने मंत्री करत आहेत, हे अत्यंत निषेधार्ह आहे.

संघटनेने निवेदनात नुकसानभरपाई चौपट दराने - महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार जिरायतीसाठी १३,६००, बागायतीसाठी २७,००० व बहुवार्षिक पिकांसाठी ३६,००० रुपये प्रति हेक्टर मदत ठरवली आहे. मात्र, ही मदत चौपट दराने देण्यात यावी. म्हणजे अनुक्रमे ५४,४००, १,०८,००० व १,४४,००० रुपये प्रति हेक्टर मदत जास्तीत जास्त तीन हेक्टर क्षेत्राकरिता मिळावी. नैसर्गिक आपत्ती निधीतील महागाई भत्ता - शासकीय कर्मचाऱ्यांना जसा दर सहा महिन्यांनी महागाई भत्ता मिळतो, तसा शेतकऱ्यांच्या मदतीतही वाढ करण्यात यावी. पंतप्रधान पीकविमा योजनेत सुधारणा - 'ॲड ऑन कव्हर' (पैरणी न होणे, हंगामातील प्रतिकूल परिस्थिती, स्थानिक आपत्ती व काढणीपश्चात नुकसान) या चार तरतुदी पुन्हा लागू करण्यात याव्यात. नुकसान अहवाल तात्काळ सादर करून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा करावी. जुलै-ऑगस्टमधील अहवालात बागायती व फळबागांचा समावेश करावा. कर्जमाफी - कोणत्याही अटी-शर्तीशिवाय शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी. एमएसपीप्रमाणे खरेदी - सोयाबीन, कापूस, तूर व खरीपातील सर्व पिकांची बाजारभावाऐवजी हमीभावाने खरेदी तातडीने सुरू करावी. ऊस उत्पादकांवरील १५ रुपये प्रतिटन कपात - सरकारचा हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा आदि मागण्या केल्या.मोर्चामध्ये उपस्थित शेतकरी नेत्यांनी इशारा दिला की, जर शासनाने सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर जिल्ह्यातील शेतकरी आणखी तीव्र आंदोलन छेडतील.

या मोर्चात हेमचंद्र शिंदे, रामप्रसाद गमे, गजानन तुरे, विशंभर गोरटे, कलीम भाई, मुंजा लोडे, नागेश दुधाटे, हनुमान आमले, विठ्ठल चौखत, किशन शिंदे, पंडित अण्णा भोसले,



# बीड येथे भारतीय धम्म महासंघाच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा

केज/प्रतिनिधी

दिनांक २ ऑक्टोबर २०२५ रोजी ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त भारतीय धम्म महासंघ महाराष्ट्र राज्य बीड जिल्हा युनिटच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी रथातून तथागत गौतमबुद्ध,सम्राट अशोक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून वंदन करण्यात आले.मधून रॅली तथागत चौक ते धानोरा रोड मार्गे नगर रोड मार्गे,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून बुद्ध वंदना घेण्यात आली. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून सामुदायिक बुद्ध वंदना त्रिशरण पंचशील याचे पठण करण्यात व महापुरुषांचा जयघोष करण्यात आला या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने बुद्ध उपासक, उपासिका उपस्थित होत्या.यावेळी भारतीय धम्म महासंघाचे जिल्हाध्यक्ष भास्कर कांबळे,एस.एम.जोगदंड,अड.चंद्रवदन जाधव,बौद्धाचार्य धर्मराज मुजमुले,सुनील वाघमारे,भिवाजी जोगदंड,सतीश कापसे, राहुल कांबळे,दत्ता कसबे,दिनानाथ सोनवणे,रवी,बौद्ध उपासक व उपासिका मोठ्या संख्येनेउपस्थित होत्या.कार्यक्रमाचे आयोजन भारतीय धम्म महासंघ बीड जिल्हा युनिटच्या वतीने करण्यात आले होते.

## शासकीय तंत्रनिकेतनला राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक

# उत्कृष्ट ग्रीन क्लब पुरस्काराने गौरव

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन आणि युनिसेफ मार्फत राज्यातील १३ जिल्ह्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त महाविद्यालयांमध्ये युवकांच्या मार्फत नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पाण्याची बचत (धींेंह एपसरसशाशपीं रपव थरींशी डींशुरीवीहळी) हे अभियान राबविले जात आहे. निवडक १३ जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक संसाधने व पाण्याची बचत या अभियानांतर्गत सर्व महाविद्यालयांमध्ये ग्रीन क्लब स्थापन करून विविध उपक्रम राबविले जात आहेत. पाणी बचतीच्या उपाययोजनांसाठी ग्रीन क्लबच्या माध्यमातून सात सहज करण्याजोग्या कृती योजना राबविल्या जात आहेत. जागतिक जलदिनाच्या निमित्ताने व ग्रीन क्लबच्या मार्फत महाविद्यालय स्तरावर शैक्षणिक वर्ष २०२३- २४ मध्ये विविध उपक्रमांच्या माध्यमातून पाणी बचतीच्या उपायोजनांसाठी ग्रीन क्लबच्या माध्यमातून केलेल्या कार्याचे मूल्यांकन करून पुरस्कार जाहीर करण्यात आले श्र. या पुरस्कारांचे वितरण ना. चंद्रकांत पाटील, मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते करण्यात आले. सदरील पुरस्कार वितरण सोहळा सोमवार दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता सीओईपी टेक्नॉलॉजीकल यूनिवर्सिटी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे येथे संपन्न झाला. या पुरस्कारांमध्ये जिल्ह्यातील शासकीय तंत्रनिकेतन बीड या संस्थेला 'राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक उत्कृष्ट ग्रीन क्लब' हा पुरस्कार देण्यात आला. तसेच शासकीय तंत्रनिकेतन बीड या संस्थेने जिल्हास्तरावरील देखील प्रथम पुरस्कार आणि बेस्ट शॉर्ट रील व्हिडीओ चा जिल्हास्तरीय तृतीय पुरस्कार पटकाविला. संस्थेतील यंत्र अभियांत्रिकी विभागातील अधिव्याख्याता तसेच बीड जिल्हा समन्वयक श्रीमती वावरे अमृता उद्धव यांना 'उत्कृष्ट ग्रीन क्लब फॅकल्टी कॉरडीनेटर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या संस्थेतील संगणक अभियांत्रिकी विभागातील तृप्ती क्षीरसागर या विद्यार्थिनीस जिल्हास्तरीय उत्कृष्ट पोस्टर प्रेसेंटेशन द्वितीय पारितोषिक मिळाले. तसेच ग्रीन क्लब संस्था समन्वयक डी. बी. करवर यांना देखील समन्वयक म्हणून गौरविण्यात आले.या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी निवड झालेल्या महाविद्यालयांचे प्राचार्य,ग्रीन क्लब फॅकल्टी समन्वयक आणि संबंधित विद्यार्थी उपस्थित होते. या पुरस्कारा बद्दल तंत्रशिक्षण विभागीय सहसंचालक डॉ. किरण लाढाने यांनी संस्थेचे प्राचार्य डॉ. ए. के. वाघमारे यांचे अभिनंदन केले.

# विजयादशमी मुहूर्तावर नवीन मच्छिंद्रनाथ मंदिराचा शीला रोहन कार्यक्रम संपन्न

आष्टी (प्रतिनिधी) साडेतीन मुहूर्तांपैकी अत्यंत मंगल असलेल्या विजयादशमीच्या मुहूर्तावर श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथगड मायंबा येथील नवीन दगडी मंदिर बांधकामाच्या शीला रोहनाचा शुभारंभ देवस्थानचे विश्वस्त आ. सुरेश धस यांचे हस्ते करण्यात आला



या वेळी मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष हरिभक्त परायण बबन महाराज भैरवाल मच्छिंद्रनाथ देवस्थानचे अध्यक्ष सचिव विश्वस्त माजी आमदार साहेबराव दरेकर, अ.भा.किसान संघाचे नीलेश चिपाडे,विश्वस्त ताठे आदि उपस्थित होते.. या नियोजित भव्य दिव्य नाथ समाधी मंदिराचे बांधकाम देगलूर परिसरातील उच्च दर्जाचा दगड वापरण्यात येणार आहे .. हा शीलारोहनाचा कार्यक्रम संत,महंतांच्या उपस्थितीत संपन्न झाला..

यावेळी दानशूर नाथ भाविक भक्तांनी या मंदिराच्या कामासाठी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आहे.

# कुंटुरकर साखर कारखान्याच्या ११ वा बॉयलर दसऱ्याच्या मुहुर्तावर संपन्न

नांदेड : नायगांव तालुक्यातील कुंटुर येथील कुंटुरकर शुगर अँन्ड आँग्रो प्रा.लि. चा २०२५/२६ चा गाळप हंगाम चा बाँयलर आग्नी प्रदीपन सोहळा विजयादशमी मुहूर्तावर दि.२ अँक्टोबर रोजी दुपारी १ वाजता संपन्न झाला,याप्रसंगी उद्धाटक म्हणून करण कृष्णांत पाटील व सौ.शगुन करण पाटील प्रसिद्ध उद्योजक कोल्हापूर यांच्या शुभहस्ते पार पडला.याप्रसंगी कारखान्याचे चेअरमन राजेश गगांधरराव देशमुख कुंटुरकर यानी याप्रंसगी कुंटुरकर साखर कारखान्याच्या उत्तम उभारीसाठी ऊस उत्पादक व कामगार कर्मचारी यांचे महत्त्वाचे योगदान आहे असे म्हणाले.

येणाऱ्या हंगामात अधिक ऊस गळीत आणि गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळवण्याची गरज

कारखान्याची आर्थिक कार्यक्षमता वाढीसाठी येणाऱ्या हंगामात ऊसाचे जास्तीत जास्त गाळप झाले पाहिजे. त्याचबरोबर त्याचे गुणवत्तापूर्ण तांत्रिक परिणामसुद्धा मिळाले पाहिजेत, त्यासाठी कारखान्याच्या शेतकी विभागाबरोबरच तांत्रिक विभागातील सर्व कर्मचाऱ्यांवर महत्त्वाची जबाबदारी राहणार आहे. म्हणून उत्पादन वाढीबरोबरच उत्पादकता वाढीसाठी सर्व कामगारांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन कुंटुरकर कारखान्याचे चेअरमन राजेश गगांधरराव देशमुख कुंटुरकर यांनी केले.

कुंटुरकर कारखान्याच्या ११ व्या ऊस गळीत हंगामाच्या बॉयलर अग्नी प्रदीपन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी कारखान्याचे जनरल मँनेजर गणपत काळे यानी प्रास्तविक करुन कारखान्याचे मागील वर्षी झालेले गांळपा पेक्षा यावर्षी जास्तीत जास्त करुण देण्याची जवाबदारी कामगार व कर्मचारी कट्टिबद्ध आसल्याचे सांगितले.तर अँड ज्ञानेश्वर मोरे यानी आपल्या भाषणात कारखान्याच्या सुरूवाती पासुन ते आजपर्यंतचा इतिहास सांगितला व या नायगांव तालुक्यातील पंचक्रोशीतील हा शेतकऱ्यांच्या कामधेनू आहे,तर कारखान्याचे चेअरमन राजेश




देशमुख कुंटुरकर यानी हा कारखाना यशस्वी करुन दाखवला आसेही ते म्हणाले.

करण कृष्णांत पाटील व सौ.शगुन करण पाटील प्रसिद्ध उद्योजक कोल्हापूर यांच्या हस्ते बॉयलरची विधिवत पूजा करण्यात आली.चेअरमन राजेश गगांधरराव देशमुख कुंटुरकर.संचालक सौ.मधुमती राजेश देशमुख.रूपेश गगांधरराव देशमुख कुंटुरकर.अंबादासराव धर्माधिकारी बरबडेकर. यांच्या शुभहस्ते बॉयलरचे अग्नी प्रदीपन करण्यात आले.

कुंटुरकर कारखान्यातील बहुतेक कर्मचारी कारखाना परिसरातील रहिवासी आहेत. कार्यक्षेत्रातील प्रत्येक गावातून जास्तीत जास्त ऊस आपल्या कारखान्यातच गळीताला येणे आवश्यक आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. कारखान्याचे ऊस गाळप जास्त झाले पाहिजे, उतारा चांगला मिळाला पाहिजे, ऊस गाळप वाढले तर विजेचेही उत्पादन वाढेल हा प्रकल्प यशस्वी होत आहे पुढे भविष्यकाळात इथेनॉल प्रकल्पातूनही त्या प्रमाणात वाढीव उत्पादन घेता येईल, म्हणून गळीत जादा झाले तर त्याचा फायदा निश्चितच शेतकरी.व कामगारांनाही होईल. मात्र उत्पादनाची गुणवत्ता चांगली मिळाली पाहिजे, त्यासाठी कारखान्याचे अधिकारी आणि तांत्रिक विभागातील कर्मचाऱ्यांनी अधिक कार्यक्षमतेने काम करण्याची गरज आहे. प्रत्येकालाच आपली गुणवत्ता सिद्ध करावी लागेल, असा इशारा द्यायलाही ते विसरले नाहीत. कामगारांना दिवाळीपूर्वी लवकरच गेल्यावर्षी केलेल्या कामाची बक्षिस रक्कम वाटप करण्यात येईल,

सततची अतिवृष्टी, नदी, नाल्यांना आलेल्या बँक वॉटर मुळे खरीप पिकांची पूर्णत नासाडी झाली यावर्षीच्या दसरा महोत्सवावर ओल्या दुष्काळाचे सावट असल्यामुळे या महत्वाच्या सणाच्या कालावधी मध्ये जनतेच्या चेहऱ्यावर उत्साह व आनंद दिसुन येत नाही असे नमुद करून अडचणीत सापडलेल्या शेतकरी, शेतमजूर व शेतीवर आधारीत व्यावसायिकांना राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या माध्यमातून योग्य प्रकाराची मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही याप्रेसगी बोलताना दिली


# राष्ट्रकुल संसदीय परिषदेसाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांची निवड

## बारबाडोस मध्ये ५ ते १५ ऑक्टोबर दरम्यान भरणार जागतिक संमेलन

नांदेड : जागतिक स्तरावरील शांतता , सुरक्षितता आणि वैश्विक विकासाच्या अनुषंगाने काम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संसद परिषदेचे ६८ वे आंतरराष्ट्रीय संमेलन येत्या ५ ते १५ ऑक्टोबर दरम्यान बारबाडोस येथे पार पडणार असून या जागतिक संमेलनासाठी भारतातून लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्या नेतृत्वात राज्यसभा उपसभापती हरिवंश सिंह , यांच्यासोबत खा. डॉ. अजित गोपछडे यांची निवड करण्यात आली आहे. अलीकडच्या काळात या जागतिक संमेलनासाठी निवड होणारे ते मराठवाड्यातील पहिले खासदार ठरले आहेत.

राष्ट्रकुल संसदीय परिषद (ऊोप-ुशरश्रींह झरीश्रळराशपींरीू उेपषशी-शपलश) ही राष्ट्रकुल सदस्य देशांमधील संसदीय सदस्यांची एक संघटना आहे. जगभरातील तब्बल ५६ स्वतंत्र राष्ट्रांचा या परिषदेत सहभाग आहे. या परिषदेत लोकशाही, सुशासन आणि मानवी हक्कांशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा





करण्यासाठी व अनुभव सामायिक करण्यासाठी एकत्र चर्चा सत्र आयोजित केले जातात .

लोकशाही, मानवी हक्क, सुशासन आणि शांतता यांसारख्या समान तत्त्वांवर आणि मुद्द्यांवर चर्चा करणे, सदस्य देशांमधील संसदीय प्रणाली आणि प्रशासनातील अनुभव एकमेकांना सामायिक करणे. सदस्य देशांमध्ये सहकार्याचे संबंध प्रस्थापित करणे यासोबतच जागतिक शांतता , सुरक्षितता , जागतिक आरोग्य , आंतरराष्ट्रीय दहशतवाद , आतंकवाद निर्मूलन , बदलते पर्यावरण यासारख्या अनेक महत्वपूर्ण विषयांवर या परिषदेत चर्च केली जाणार आहे . जागतिक विकासासाठी प्रभावी ध्येय धोरणे निश्चित करून त्यांची अंमलबजावणीही केली जाते. यावर्षीचे राष्ट्रीय संसद परिषद ( कॉमनवेल्थ पार्लमेंटरी कॉन्फरन्स) दिनांक ५ ते १५ऑक्टोबर दरम्यान ब्रिजटाउन बारबाडोस येथे पार पडणार आहे. या परिषदेसाठी भारतातून लोकसभा सभापती ओम बिर्ला , राज्यसभा उपसभापती हरिवंश सिंह, यांच्या सोबतच राज्यसभा खासदार रेखा शर्मा , खा. पुरंदेश्वरी, खा. विष्णु दत्त शर्मा, खा. डॉ के. सुधाकर, खा. अनुराग शर्मा आणि खा. डॉ. अजित गोपछडे

यांची निवड करण्यात आली आहे . वैश्विक स्तरावरील अनेक महत्त्वपूर्ण चर्चांमध्ये सहभागी होण्याची संधी खा. डॉ. अजित गोपछडे यांना प्राप्त झाली आहे



# आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्ट जुना कौठा येथील रावणाचे दहन..

नवीन नांदेड -,श्री.बालाजी चॅरिटेबल ट्रस्ट जुना कौठा विकास नगर नांदेडचा वतीने तीस फूट उंच असलेल्या दहा तोंडी रावणाचे दहन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी हजारो भाविक भक्तांचा उपस्थितीत रावण दहन करण्यात आले.

१५ व्या ब्रम्होत्सव निमित्ताने २२सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर दरम्यान ब्रम्होत्सव सेवा,भजन संध्या, बालाजी पालखी परिक्रमा,यासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजीत करण्यात आले होते विजया दशमी निमित्ताने ०२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी रावण दहनआमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, नगरसेवक राजू पाटील काळे, नगरसेवक राजू भाऊ गोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, विनोद काकडे, राठोड, यांच्या सह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

श्री भगवान बालाजीच्या मुख्य रथ विजया दशमीचा दिवशी दुपारी ३ वाजता मंदीरा पासून मुख्य मार्गावर निघुन जुना कौठा विठ्ठल मंदिर कडुन परत बालाजी मंदिर मार्गावर भव्य मिरवणूक काढण्यात आली होती विविध ठिकाणी परिसरातील महिला भाविक भक्तांनी पुष्पवृष्टी व रांगोळी काढून भव्य स्वागत केले, महाआरती नंतर सायंकाळी ७ ,३० वाजता रावण दहन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर माजी आमदार यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी माजी आमदार मोहनराव हंबर्डे नगरसेवक राजे गोरे राजू काळे . जिल्हा परिषद नांदेड चे सदस्य.गंगाप्रसाद काकडे. भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष अपर्णाताई चितळे. आर्य वैश्य परिवार मंडळ कवठ्याचे अध्यक्ष लक्ष्मीकांत मुक्कावार. कोषाध्यक्ष .सचिन काशेटवार.ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक उमाकांत चिंचोलकर व अधिकारी पोलीस अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवराचे स्वागत विश्वस्त समिती पदाधिकारी यांनी केले. संस्थापक अध्यक्ष विजयकुमार पवार, कार्याध्यक्ष उद्धव बसवदे कोषाध्यक्ष उत्तमराव भाले, सचिव बाबाराव इबितवार. जिल्हा परिषद गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष उत्तमराव वरपडे .गंगाधर बडवणे, अभय मोरे. बालाजी तमकुटेड.गणेश किर्तने, साईप्रसाद वरपडे राजू बुलबुले वेणुगोपाल रांधड डॉ. सुरेंद्र गटानी भगवानराव पुजारी विनोद सुत्रावे आधी भक्तांनी, व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.



# स्वामी विवेकानंद महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ यांची जयंती साजरी

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

दि.०३ऑक्टोबर २०२५ रोजी स्वामी विवेकानंद महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ यांची जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक इनामदार हे होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री.छ.शिवाजी जुनिअर कॉलेजचे प्राचार्य मुकुंद जाधव प्रा.बबन जाधव प्रा.भारतभूषण बाळबुधे, श्री.संतोष पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आर.बी.बाविस्कर यांनी केले तर प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.मा.म.गायकवाड यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.एल.सकनुरे व विद्यार्थ्यांनी अंजली नाईक यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जीवन कार्याबद्दल माहिती दिली. यावेळी महाविद्यालयातील डॉ.खराबे बी.पी.,डॉ.पांचाळ एन.एच.,श्री.उमाकांत गायकवाड याबरोबरच महाविद्यालयातील रोहिणी पांचाळ,पूजा पांचाळ, ऋतुजा होनलवाड ,सोपान पांचाळ व इतर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते शेवटी उपस्थितांचे आभार रासेयो सह कार्यक्रमाधिकारी डॉ.आर.बी.मादळे यांनी मानले.

# सिडकोचा कायापालट करण्यासाठी सिडको करांनी राष्ट्रवादी काँग्रेस चा महापौर करा आ चिखलीकर

इतर पक्षांना काडी सारखे बाहेर काढा

सत्ताधारी मंडळीने सिडको करांच्या तोंडाला पाने पुसली

नांदेड, (जिल्हा प्रतीनिधी ) दसरा विजया दशमी निमित्त हाडको बालाजी मंदीर येथे दर्शन घेण्यासाठी लोहा कंधार विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी कॉग्रेस अजीत दादा पक्षाचे आ प्रताप पाटील हे आले असता मंदीर समिती च्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला यावेळी त्यांना बोलत असताना सांगीतले की गेल्या सात दशकांपासून येथे सत्ताधारी मंडळी महापालिकेवर सत्ता गाजवत असून. ते सिडकोवासियांच्या नशिबी फक्त तीच घरे, त्याच नाल्या आणि तोच दुर्गंधी आहे. त्यामुळे सिडकोतील नागरिकांवर अन्याय करणा-या सत्ताधा-यांना यावेळी घरी बसविण्याची वेळ आली असून ते फक्त निवडणुकीच्या काळात स्टार प्रचारक म्हणून येतात मोठ मोठ्या गोष्टी करूण सिडको करांना नेहमी प्रमाणे आश्वासन देतात आणि आपली आपल्या स्वार्था साठी पोळी भाजून घेतात त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसला महापालिका निवडणूकीत जास्तीत जास्त उमेदवार निवडुण देऊन आमच्या पक्षाचा महापौर करा एका वर्षा मध्ये सिडकोतील प्रलंबीत प्रश्न, समस्या दूर करून सिडकोचा कायापालट करू असे आश्वासन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिले आहे.

विजयादशमी निमित्त दरवर्षाप्रमाणे यावर्षीही आ. चिखलीकर यांनी बालाजी मंदिरात दर्शनासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, सिडकोवासियांचे आणि माझे अतूट नाते आहे. अनेक सुखदु:खात माझ्या सोबत आहेत. मनपाच्या सत्ताधारी मंडळीवर जोरदार टीका करतांना आ. चिखलीकर यांनी सिडकोतील अनेक समस्यांचा उहापोह केला. सत्तर वर्षे पासून सत्ताधारी मंडळीनी नांदेड महापालिकेवर राज केले. पण पायाभूत मलभूत सुविधा सोडविण्यात त्यांना अपयश आले आहे. सिडकोतील घरांच्या हस्तांतरणाचा प्रश्न असो वा प्रमुख रस्त्यांचा... सिडकोवासियांच्या नशिबी आजही तीच गटारे, त्याच नाल्या आणि तोच दुर्गंध आहे. त्यामुळे सत्ताधारी मंडळी सत्तर वर्षांत जी विकासाभिमूख कामे केली नाहीत, ती सर्व कामे एका वर्षांत आपण मार्गी लावू. त्यासाठी सिडकोवासियांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पाठीशी उभे राहून पक्षाला आगामी निवडणुकीत महापालिकेत पाठवा, असे आवाहनही आमदार चिखलीकर यांनी केले.



यावेळी बालाजी मंदिरात संस्थानच्यावतीने आ. चिखलीकर यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे भाजपचे संतोष वर्मा वैजनाथ देशमुख, माणिकराव देशमुख, शिवसेना ओबीसी जिल्हाप्रमुख अनिल पाटील धमने .अशोक मोरे .संग्राम मोरे . माधवराव लोंढे गजानन लोंढे सदाशिव कदम बामणीकर मंगेश कदम डि के कांबळे गजानन मोरे गुंडेवाचे उपसरपंच सदानंद गुडेगावकर, बाभुळगावचे सरपंच दत्ता मोरे कार्यक्रमाला सिडकोतील प्रतिष्ठित नागरिक, भाविक तसेच पत्रकार मंडळी उपस्थित होती.

सिडकोतील घरांच्या हस्तांतरणाचा प्रश्न मार्गी लावू

सिडकोतील घरांच्या मालकीचा प्रश्न हा महत्वाचा विषय आहे. आजवर कॉंग्रेसने सिडकोवासियांच्या तोंडाला पाने पुसण्याचेच काम केले आहे. वर्षानुवर्षे घरांच्या हस्तांतरणाचा प्रश्न प्रलंबित असल्याने सिडकोवासियांमध्ये सत्ताधारी यांच्या विरोधात मोठया प्रमाणात नाराजी आहे. त्यामुळे आगाणी महापालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसला महापालिकेत पाठविल्यास आपण वर्षभरात सिडकोच्या घरांच्या हस्तांतरणाचा प्रश्न राज्याच्या विधीमंडळात मांडून हा जिव्हाळ्याचा प्रश्न कायमचा मार्गी लावू, असेही आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सांगितले.

# विजयादशमी निमित्ताने सिडकोत आयोजित पथसंचलनाचे पुष्प वृष्टी करून उत्साहात स्वागत..

नवीन नांदेड - विजयादशमी ( दसरा ) निमित्य २ ऑक्टोबर रोजी आर.एस.एस (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) तर्फे शताब्दी वर्षा निर्मित्त सिडको स्वामी समर्थ केंद्र ते सिडकोतील मुख्य रस्त्याने आयोजित करण्यात आलेल्या पथसंचलनाचे सिडको छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे उदय देशमुख मित्र मंडळ तर हडको येथे भाजपा महानगर उपाध्यक्ष संजय पाटील घोगरे यांच्या वतीने पुष्पवृष्टी करून भव्य दिव्य स्वागत करण्यात आले.

प्रथमच सिडको भागात राष्ट्रीय स्वयंसेवक यांच्या वतीने विजया दशमी निमित्ताने पथसंचलन करण्यात आले, यावेळी सिडको येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे उदय भाऊ देशमुख मित्र मंडळ यांच्या वतीने भाजपा महानगर उपाध्यक्ष संजय पाटील घोगरे, वाघाळा भाजपा मंडळ अध्यक्ष सचिन रावका,माजी नगरसेवक संजय इंगेवाड, सिध्दार्थ गायकवाड, वैजनाथ देशमुख,सतिश बसवदे,राजु लांडगे,मौनु जोशी यांच्या सह



पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी तर ,हडको छत्रपती शिवाजी महाराज पुतळा भाजपा उपाध्यक्ष संजय पाटील घोगरे यांच्या वतीने पुष्पवृष्टी करण्यात आली या पंथसचलन मध्ये प्रमुख वक्ते आशिष सिंह चौधरी जिल्हा कार्यवाहक व प्रमुख अतिथी म्हणून वृक्ष मित्र मोहन लालाराव घोगरे यांच्या सह सिडकोतील पदाधिकारी जनार्दन ठाकूर, विनोद कांचनगिरे, संतोष कांचनगिरे, स्वामी धिरज,सिध्दार्थ धुतराज, यांच्या सह पदाधिकारी सहभागी होते, सिडको ते हडको व परत पुन्हा मुख्य मार्गावर अनेक ठिकाणी नागरीक पदाधिकारी यांनी पुष्पवृष्टी केली, पथसंचलन नेतृत्व तुकाराम बेसते यांनी केले. यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे व पोलीस अंमलदारांनी मुख्य मार्गावर वाहतूक सुरळीत ठेवुन कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवला होता.



# पोलिस उपनिरिक्षक सुर्यभान कागणे सेवानिवृत्त !

मुखेड /ता. प्रतिनिधी

नांदेड पोलीस अधीक्षक कार्यालयातील जनसंपर्क विभागात पोलिस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असलेले सूर्यभान कागणे हे ३० सप्टेंबर रोजी नित्य आहेत. वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा दि. ३० सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात पार पडला आहे.

सुर्यभान दिगांबरराव कागणे, रा. हिब्बट ता. मुखेड येथील रहिवाशी असुन ४ सप्टेंबर १९९१ रोजी नांदेड पोलीस दलात पोकॉ म्हणुन भरती झाले. त्यांनी ३४ वर्षाच्या कालावधीत विविध पोलिस ठाण्यात कर्तव्य बजावले. ते महामार्ग पथकात असतांना

३०जुलै २००५ रोजी पेट्रोलींग दरम्यान, गंभीर अपघातात त्यांचे दोन्ही पाय कमरेच्या खालुन निकामे झाले. डॉक्टरांनी ऑपरेशन करुन ४५ दिवसात डिस्चार्ज दिल्यानंतर कागणे पुन्हा अपघातानंतर २० मे २००६ रोजी कर्तव्यावर पुन्हा हजर झाले. आठ वर्षाचा कालावधी जनसंपर्क कार्यालयात पुर्ण करुन ३० सप्टेंबर रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पुन्हा सेवेची संधी दिली तर मानधनावर सेवा बजावणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. येवती येथील माजी उपसरपंच बालाजी नागरगोजे यांचे ते मामा आहेत.